पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २८६ ■ शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# उद्धव ठाकरे-देवेंद्र फडणवीसांची मध्यरात्री वर्षावर गुप्त भेट ?



## राज्यात राजकीय भूकंपाची चिन्हं! मोठ्या राजकीय समीकरणांची सुरुवात

प्रतिनिधी २५ एप्रिल

**मुंबई:** राज्यातील राजकारणाला नवा कलाटणी देणारी एक मोठी चर्चा सध्या जोर धरताना दिसत आहे. उद्धव ठाकरे यांनी मध्यरात्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा या अधिकृत निवासस्थानी भेट घेतल्याचा दावा समोर आला आहे. या दाव्यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली असून, आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या भेटीचे महत्त्व अधिक वाढले आहे. नेमकी ही भेट का झाली, याबाबत अधिकृत माहिती समोर नसली तरी अनेक तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. ही चर्चा एका ट्विटमुळे पेटली आहे. प्रबुद्ध भारत या माध्यम संस्थेने सूत्रांच्या आधारे केलेल्या दाव्यानुसार, ठाकरे आणि फडणवीस यांच्यात मध्यरात्री भेट झाली. मात्र, या भेटीचे स्वरूप, कालावधी किंवा चर्चेचे विषय याबाबत कोणतीही ठोस माहिती समोर आलेली नाही. तरीही, हा दावा समोर आल्यानंतर राज्यातील राजकीय वातावरणात अस्वस्थता निर्माण झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून ठाकरे आणि फडणवीस यांच्यातील संबंध ताणलेले असल्याचे दिसून आले होते. २०१९ साली मुख्यमंत्रीपदावरून झालेल्या वादानंतर शिवसेना आणि भाजप यांच्यातील युती तुटली. त्यानंतर ठाकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेससोबत मिळून महाविकास आघाडी स्थापन केली. या राजकीय बदलामुळे राज्यातील समीकरणे पूर्णपणे बदलली होती. मात्र, अलीकडच्या काळात दोन्ही नेत्यांमध्ये थेट संवाद नसला तरी अप्रत्यक्ष सुसंवादाची चिन्हे दिसू लागली होता पार्श्वभूमीवर विधान परिषद निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर राजकीय हालचालींना वेग आला आहे. १२ मे रोजी होणाऱ्या मतदानाच्या आधी विविध पक्षांकडून रणनीती आखली जात आहे. अशा परिस्थितीत ठाकरे–फडणवीस भेटीचा दावा समोर आल्याने ही केवळ औपचारिक भेट आहे की मोठ्या राजकीय समीकरणांची सुरुवात, यावर चर्चा सुरू झाली आहे.दरम्यान, काही दिवसांपूर्वी विधान परिषदेतील निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या कार्यक्रमात दोन्ही नेत्यांनी एकमेकांशी संवाद साधत शेरोशायरीही केली होती. या प्रसंगी त्यांनी परस्पर आदर व्यक्त केला होता. त्यामुळे, दोघांमध्ये संवादाची दारे पूर्णपणे बंद नाहीत, असे संकेत मिळाले होते. या पार्श्वभूमीवर मध्यरात्रीच्या भेटीचा दावा अधिकच महत्त्वाचा मानला जात आहे.राजकीय विश्लेषकांच्या मते, या भेटीचा संबंध विधान परिषद निवडणुकीशी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. एका अंदाजानुसार, ठाकरे हे विधान परिषदेसाठी इच्छुक नसल्याचे बोलले जात आहे. जर त्यांनी निवडणूक लढवली नाही, तर महाविकास आघाडीच्या गणितांवर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत महायुतीला अतिरिक्त फायदा मिळण्याची शक्यता आहे.दुसरीकडे, काही तज्ज्ञांचे मत असेही आहे की, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला राजकीय उत्तर देण्यासाठी ठाकरे यांची विधान परिषदेत उपस्थिती भाजपसाठीही फायदेशीर ठरू शकते. त्यामुळे या भेटीमागे राजकीय समन्वयाचा प्रयत्न असू शकतो, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.या सर्व चर्चांदरम्यान, शिवसेना नेते संजय राऊत यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी स्पष्ट केले की, या भेटीबाबत नेमकी माहिती फक्त ठाकरे आणि फडणवीस यांच्याकडेच आहे.

नाशिकमध्ये माध्यमांच्या प्रश्नावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, उद्धव ठाकरेंना जर मला भेटायचं असेल किंवा आमची भेट व्हायची असेल तर ती लपून छपून करण्याची आवश्यकता नाही. ती ओपनली देखील केली जाऊ शकते. ते कुठलेच विषय आमच्यात नाहीत की, जे लपवायची आवश्यकता आहे. अशा प्रकारची कुठलीही भेट घडलेली नाही. काही लोक जाणीवपूर्वक चुकीच्या पद्धतीने खोट्या बातम्या देतात त्या खोटारड्या हँडल्सवर नोटीस बजावली जाईल, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

# अकोलेकर अलर्ट

# 45 अंशांचा तडाखा

## पुढील ३ दिवस 'हीटवेव्ह'चा इशारा

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोला.** पुढील तीन दिवस अकोलेकरांनी उन्हापासून स्वतःची काळजी घेण्याची गरज आहे. आज ४५ अंश सेल्सिअस तापमान होते. पुढील तीन दिवस उष्णतेच्या लाटेचा अलर्ट हवामान खात्याबरोबर अकोला जिल्हा प्रशासनाने दिला आहे. तेव्हा सावधान....

विदर्भातील सूर्याचा प्रकोप वाढला असून, अकोला जिल्हा पुन्हा एकदा देशातील उष्ण शहरांच्या यादीत वरच्या क्रमांकावर पोहोचला आहे. नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने अकोल्यात २५ ते २७ एप्रिल दरम्यान 'उष्णतेच्या लाटेचा' गंभीर इशारा दिला असून तापमानाचा पारा ४५ अंश सेल्सिअस ओलांडण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिकांसाठी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हाची तीव्रता सर्वाधिक असते. या काळात अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नका. तहान लागलेली असो वा नसो, सतत पाणी पित राहा. ओआरएस , लिंबू पाणी, ताक, लस्सी यांसारख्या पेयांचा आहारात समावेश करा. कष्टाची किंवा शारीरिक श्रमाची कामे सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा करावीत. उष्णतेमुळे वाहनांमध्ये आगी लागण्याच्या घटना घडू शकतात, त्यामुळे ज्वलनशील पदार्थांपासून सावध राहा. पार्क केलेल्या बंद वाहनात लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना सोडू नका. जर कुणाला चक्कर येणे, तीव्र डोकेदुखी, सततचा घाम किंवा मळमळ असा त्रास होत असेल, तर तो उष्माघाताचा झटका असू शकतो. अशा वेळी त्वरित सावलीत विश्रांती घेऊन डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.कडक उन्हामुळे आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करा आणि सुरक्षित राहा.



### अकोला देशात दूसऱ्या क्रमांकाचे हॉट सिटी

- देशाच्या अनेक भागांमध्ये उष्णतेच्या लाटेचा प्रभाव वाढत आहे. शुक्रवारी, महाराष्ट्रातील अकोला येथे ४५अंश सेल्सिअस आणि अमरावतीमध्ये ४४.८अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. उत्तर प्रदेशातील प्रयागराजमध्ये ४५.२अंश सेल्सिअस या सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. वायव्य, उत्तर, मध्य आणि पश्चिम भारतातील पाच राज्यांमधील १४ शहरांमध्ये पारा ४४अंश सेल्सिअस च्या वर गेला आहे. यामध्ये वाराणसी, बांदा, रोहतक, झारसुगुडा, टिटलागड, अकोला, अमरावती, वर्धा, चंद्रपूर, यवतमाळ, बारमेर, हमीरपूर, आग्रा आणि राजनांदगाव यांचा समावेश आहे.
- उत्तर प्रदेशातील ६० जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. ओडिशामधील झारसुगुडा येथे सलग दुसऱ्या दिवशी ४४.८अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. मध्य प्रदेशातील ११ जिल्ह्यांमध्ये उष्णतेच्या लाटेचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. हिमाचल प्रदेश या डोंगराळ राज्यातील तीन जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट पसरली असून, उनामध्ये तापमान ४१.१अंश सेल्सिअस पर्यंत पोहोचले आहे.बिहार, छत्तीसगड, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, मध्य प्रदेश, पंजाब, महाराष्ट्र, राजस्थान आणि उत्तर प्रदेशात उष्णतेची लाट येईल. हरियाणा, चंदीगड, दिल्ली, ओडिशा आणि उत्तर प्रदेशातील काही भागांमध्ये उष्ण रात्री (वॉर्म नाईट कंडिशन) राहण्याचीही शक्यता आहे. आंध्र प्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल, गुजरात, गोवा, ओडिशा आणि तामिळनाडूमध्ये खूप उष्ण आणि दमट हवामान असू शकते.

# बागेश्वर बाबांचा दाव्याने वादाला तोंड
# ४ मुले जन्माला घालून १ संघाला द्या

प्रतिनिधी २५ एप्रिल

**नागपूर** सततच्या युद्धामुळे थकलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी रामदास स्वामींकडे आपले राज्य सोपवण्याची इच्छा व्यक्त केली होती, असा दावा बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांनी केला आहे. शिवाजी महाराज व रामदास स्वामी यांच्या भेटीविषयी इतिहासकारांमध्ये मतमतांतरे आहेत. त्यातच बागेश्वर बाबांनी हा दावा केल्यामुळे या वादाला पुन्हा एकदा नव्याने फोडणी मिळाली आहे. बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर महाराज यांनी नागपूरमधील एका कार्यक्रमात केलेल्या भाषणामुळे नव्याने चर्चा रंगली आहे. या कार्यक्रमात त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास स्वामी यांच्याशी संबंधित एक प्रसंग सांगत उपस्थितांना प्रेरणादायी संदेश देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या वक्तव्याने कार्यक्रमात मोठी उत्सुकता निर्माण झाली.

नागपूरमधील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट परिसरात आयोजित कार्यक्रमात भारतदुर्गा मंदिराच्या शिलान्यासानंतर धर्मसभेचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याला मोहन भागवत यांच्या हस्ते शिलान्यास पार पडला. त्यानंतर झालेल्या सभेत बागेश्वर महाराजांनी विविध धार्मिक आणि ऐतिहासिक संदर्भ देत आपले विचार मांडले.आपल्या भाषणात त्यांनी शिवराय आणि रामदास स्वामी यांच्यातील संवादाचा उल्लेख केला. त्यांच्या कथनानुसार, अनेक युद्धांनंतर थकलेले शिवाजी महाराज आपल्या गुरुंकडे गेले आणि राज्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्याची इच्छा व्यक्त केली. यावर रामदास स्वामींनी गुरु-शिष्य नात्याचा संदर्भ देत पुन्हा राज्यकारभाराची जबाबदारी शिवरायांनाच पार पाडण्याचा आदेश दिला, असा किस्सा त्यांनी सांगितला.

### संघाच्या कार्याची प्रशंसा

दरम्यान, आपल्या भाषणात बागेश्वर महाराजांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाबाबतही वक्तव्य केले. त्यांनी म्हटले की, देशावर संकट आले असता संघाचे कार्यकर्ते मदतीसाठी पुढे येतात. तसेच, चार मुलं जन्माला घाला आणि त्यातील एक संघासाठी द्या, असे आवाहन करत त्यांनी संघाच्या कार्याची प्रशंसा केली. या विधानामुळे कार्यक्रमानंतर विविध स्तरांत चर्चा सुरू झाली. एकूणच, नागपूरमधील या कार्यक्रमात बागेश्वर महाराजांनी ऐतिहासिक संदर्भ, धार्मिक विचार आणि सामाजिक संदेश यांचा संगम साधत आपले विचार मांडले. त्यांच्या भाषणातील उदाहरणे आणि विधानांमुळे उपस्थितांमध्ये उत्सुकता निर्माण झाली असून, या वक्तव्यांवर आता विविध प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.

# भाजप म्हणजे बकासुराचा पक्ष !

## राघव चड्डांच्या भाजप प्रवेशावर राऊतांची जहरी टीका

**मुंबई:** भाजपकडून सर्वच पक्षांना तोडण्याचा प्रयत्न होत आहे. ते लोकांना घाबरवतात. पण आता बकासुराचा अंत झाला आहे. शिवसेनेबद्दन २९ एप्रिलला सुनावणी झाली नाही तर आम्ही आपली भूमिका मांडू, असे उबाठाचे खासदार संजस राऊत यांनी म्हटले आहे. जर कोर्टाकडे ऐकूण घेण्यासाठी वेळ नसेल तर आम्ही काय बागेश्वर बाबाकडे जावे का? त्यांना कोर्टात आणत आमचे वकील केले तरच आमचा आवाज ऐकला जाईल का? असा सवाल राऊत यांनी केला आहे.

संजय राऊत म्हणाले की, येणाऱ्या काळात एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे किती आमदार फुटून भाजपमध्ये जाणार हे तुम्ही पाहताल. आमच्यावर सुद्धा पक्ष सोडावा म्हणून दबाव टाकण्यात आला होता पण आम्ही पक्ष सोडला नाही. आम्ही त्यावेळी व्यंकय्या नायडू यांना पत्र लिहित सांगितले की माझ्यावर पक्ष सोडण्यासाठी दबाव आणला जात आहे.

राघव चड्ढा यांच्यासह 'आप'चे सात राज्यसभा खासदार भाजपमध्ये विलीन झाले आहेत. राघव चड्ढा यांनी पक्ष फोडाफोडी करत भाजपत जाण्याचा घेतलेला निर्णय देशातील जेन-जी ला म्हणजेच तरुणाई आवडला नसल्याचे दिसून येत आहे. एका रात्रीत राघव चड्ढा यांना इन्टावर १० लाखांवर फॉलोअर्सनी थेट अनफॉलो करत त्यांचा नाद सोडला आहे. राघव चड्ढा पक्षांच्या अजेंड्यापासून फारकत घेत सोयीचे राजकारण करताना संसदेत तुलनेत सौम्य मौद्यावर आवाज उठवला होता.

## बागेश्वर बाबांच्या दाव्यानंतर
# काँग्रेस आक्रमक

प्रतिनिधी २५ एप्रिल

**नागपूर :** बागेश्वर धामचे धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांनी नागपुरात एका कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या विधानामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. देशाचे आराध्य दैवत छत्रपती शिवराज यांच्यावर अभद्र टिप्पणी केल्यानंतर धीरेंद्र शास्त्रींविरोधात सोशल मीडियात संतापाचा उद्रेक झाला आहे.

छत्रपती शिवाजी महाराज युद्ध करून थकले व ते रामदास स्वामींकडे गेले. आता मला जास्त लढायचे नाही व हे मुकूट व सत्ता तुम्ही सांभाळा, असे ते त्यांना म्हणाले असल्याचा दावा बागेश्वर महाराज यांनी केला. श्री आबाजी थत्ते सेवा आणि संशोधन संस्थेद्वारा प्रस्तावित भारतदुर्गा शक्ती स्थळाचा जामठा येथील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या परिसरात शिलान्यास सोहळ्यादरम्यान ते बोलत होते. यावरून अनेक नेतेमंडळी संताप व्यक्त केला. तर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी एक्स पोस्ट केली.

# अकोल्यात भरदिवसा महिलेवर अतिप्रसंगाचा प्रयत्न

## दीराविरुद्ध गुन्हा दाखल



प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोला:** शहरातील जुने शहर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शिवाजी नगर भागात एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका ३६ वर्षीय महिलेने आपल्या राहत्या घरात एकटे असल्याचे पाहून तिच्या चुलत दीराने घरात घुसून अश्लील भाषेत बोलून तिच्यावर अतिप्रसंगाचा प्रयत्न केल्याची तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिला ब्युटी पार्लरचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. २१ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास तिचे पती कामावर गेले होते आणि मुली शाळेत गेल्या होत्या. महिला घरात एकटी असताना तिचा चुलत दीर देवेंद्र हा जबरदस्तीने घरात घुसला. त्याने महिलेला अश्लील टिप्पणी करत, 'तू बाहेर होम सर्व्हिस देते, मग घरात द्यायला काय हरकत आहे?' असे म्हणत तिचा विनयभंग केला. महिलेने विरोध केला असता, आरोपीने तिला बेडवर ढकलले आणि तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला, ज्यामध्ये तिचे कपडे फाटले. इतक्यावरच न थांबता, आरोपी देवेंद्र आणि त्याच्यासोबत आलेल्या चेतन देवेंद्र याने महिलेला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या मारहाणीत महिलेच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून तिचे हाड फ्रॅक्चर झाल्याचे समोर आले आहे.ष्घटनेनंतर पीडित महिलेने जुने शहर पोलीस स्टेशनमध्ये धाव घेऊन तक्रार नोंदवली. पोलिसांनी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या मार्केट यार्ड शाखेचे दिमाखदार उद्घाटन

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोला:** सहकार क्षेत्रातील ११७ वर्षांची दैदिप्यमान परंपरा लाभलेल्या दि अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अकोला च्या मार्केट यार्ड शाखेचे नूतन इमारतीमध्ये स्थलांतर करण्यात आले आहे.

या नवीन कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा रविवार, दिनांक २६ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता पार पडणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज संतोषकुमार कोरपे यांच्या हस्ते संपन्न होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीषराव धोत्रे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी बँकेच्या संचालिका अपर्णाताई शिरीषराव धोत्रे आणि संचालक रामेश्वरजी वाघ यांची देखील विशेष उपस्थिती लाभणार आहे.

शेतकरी आणि व्यापारी वर्गाला अधिक दर्जेदार आणि गतिमान बँकिंग सेवा उपलब्ध करून देण्यासाठी बाजार समितीच्या परिसरातील नवीन इमारतीमध्ये ही शाखा कार्यान्वित करण्यात आली आहे.

'अविरत सेवा' हे ब्रीदवाक्य जोपासत बँकेने आपल्या तंत्रज्ञानात आणि सोयीसुविधांमध्ये मोठी सुधारणा केली असून, मार्केट यार्ड शाखेचे हे नवीन स्वरूप ग्राहकांसाठी अधिक सोयीचे ठरेल, असा विश्वास बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य यांनी व्यक्त केला आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात होत असलेल्या या उद्घाटन समारंभास सर्व सभासद, ग्राहक आणि हितचिंतकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.




CMYK CMYK

# औद्योगिक गुंतवणूकदारांना पश्चिम विदर्भाचे वावडे

## पुन्हा औद्योगिक गुंतवणूकदारांची पश्चिम विदर्भाकडे पाठ

महाराष्ट्रातील अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्यासाठी औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. नुकतेच उद्योग, ऊर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उप समितीच्या बैठकीत राज्यातील १८ प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात २.५६ लाख कोटी रुपये गुंतवणुकीचे १८ विशाल/अतिविशाल प्रकल्प उभारले जाणार आहेत. यामुळे तांत्रिक नवकल्पना, संशोधन विकास आणि मजबूत पुरवठा साखळी निर्माण होण्यास मदत होईल व त्याचा फायदा सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना पण निश्चितच होऊ शकतो. महाराष्ट्रासाठी ही बाब निश्चितच आशादायक आहे. त्यामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष एक लाखाहून अधिक रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे.

विदर्भातही १ लाख ३७ हजार ४२३ रुपयांची गुंतवणूक होणार आहे, जी राज्यातील एकूण गुंतवणुकीच्या ५० टक्क्यांहून (५३.६८टक्के) अधिक आहे. त्यामुळे विदर्भात ६८,१८५ रोजगार निर्मिती होण्याची शक्यता आहे.

परंतु विदर्भातील एकूण १ लाख ३७ हजार ४२३ कोटी रुपये गुंतवणुकीपैकी पश्चिम विदर्भात फक्त १ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. म्हणजे विदर्भातील एकूण अपेक्षित गुंतवणुकीच्या फक्त सात टक्के गुंतवणूक पश्चिम विदर्भात होणार आहे. ही बाब निश्चितच चिंतनीय आहे.



एकीकडे विदर्भ प्रगतीकडे अग्रेषित होताना पश्चिम विदर्भ सर्वच विकास क्षेत्रात मागे पडत असल्याचे चित्र दिसत आहे. प्रादेशिक विषमता दूर करण्यासाठी व पश्चिम विदर्भात गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने पश्चिम विदर्भासाठी विशेष प्रोत्साहन योजना जाहीर करणे अत्यावश्यक ठरते, ज्यात सवलतीच्या दरात जमीन उपलब्ध करून देणे, पायाभूत सुविधा विकास अनुदान, अनुदानित वीज दर (प्रति युनिट कमी दर), स्थिर सुविधा आणि लॉजिस्टिक्स समर्थन, अधिक लवचिक कामगार नियमांना परवानगी देणे, जसे की अल्प कालावधीसाठी किंवा जास्त मागणीच्या कालावधीसाठी भरती प्रक्रिया सुलभ करणे, अधिसूचित क्षेत्रांमधील घटकांना प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निकष किंवा इतर पर्यावरणीय नियमांचे पालन केल्याबद्दल स्वयं-प्रमाणपत्र देण्यास अनुमती देणे, जलद-गती मंजुरी, मेगा प्रकल्पांसाठी सानुकूलित पॅकेज, उच्च तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, ईव्ही परिसंस्था यासाठी विशेष प्रोत्साहन, तंत्रज्ञान उन्नयन (अपग्रेड), स्वच्छ उत्पादन पद्धती आणि पेटंट नोंदणी खर्चासाठी २५ टक्के ते ५० टक्के भांडवली अनुदान, वाढलेल्या उत्पादन आणि विक्रीशी निगडित आर्थिक प्रोत्साहन देणे, नवीन उत्पादन कंपन्यांसाठी कॉर्पोरेट कर दर कमी करणे, परिचालन खर्च (ऑपरेशनल कॉस्ट) कमी करण्यासाठी वस्तूंच्या विक्रीवर भरलेल्या राज्य वस्तू आणि सेवा कराच्या महत्त्वपूर्ण टक्केवारीची (५० टक्के–१०० टक्के) परतफेड करणे, पात्र परदेशी गुंतवणुकींवरील भांडवली नफा कर कमी करणे, विशेषतः ज्या गुंतवणुकी दीर्घ कालावधीसाठी ठेवल्या जातात, स्थानिक कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी झालेल्या खर्चाची परतफेड करणे, रोजगार निर्मिती आणि प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देणे, महिला, अनुसूचित जाती/जमाती किंवा दिव्यांग उद्योजकांच्या मालकीच्या औद्योगिक युनिट्ससाठी अतिरिक्त अनुदान आणि लाभ इत्यादी बाबी समाविष्ट असाव्यात. प्राध्यान्याने या बाबीकडे लक्ष न दिल्यास, पश्चिम विदर्भ (अमरावती विभाग) जो महाराष्ट्रात सर्वात मागासलेला विभाग आहे, तो विकासात अधिक अधिक मागे जाण्याची दाट शक्यता आहे.

**प्रा.डॉ. संजय खडक्कार**
माजी तज्ज्ञ सदस्य,
विदर्भ वैधानिक विकास मंडळ.

# पनीर खाताय? ते दुधाचे आहे का ते तपासा

महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय काही उपाहारगृहे, खाद्यगृहे आदी आस्थापनांत पनीरच्या नावाखाली चीज ?नालॉग प्रकारातील पदार्थ दिला जाऊ शकतो. पनीर दुधाचे आहे का ते तपासणे आवश्यक आहे, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. 'अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ हा जाहिरात व जनजागृती यांच्यादृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कायदा असून सर्वसामान्य जनतेस सकस, निर्भय व सुरक्षित अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे हा त्याचा प्रमुख उद्देश आहे.भारत हा दुग्ध उत्पादनात अग्रगण्य देश असून पनीर हा भारतीय आहाराचा एक महत्त्वाचा घटक आहे. पनीर केवळ चविष्ट नसून पोषणमूल्यांनी समृद्ध असल्यामुळे त्याचे आहारात विशेष स्थान आहे. पनीरमध्ये प्रथिने, कॅल्शियम, जीवनसत्त्वे आणि आवश्यक खनिजे मोठ्या प्रमाणात आढळतात. शाकाहारी लोकांसाठी पनीर हा प्रथिनांचा उत्तम स्त्रोत मानला जातो.'

**पनीर व चीज ॲनालॉगमध्ये मूलभूत फरक :** अन्न सुरक्षा व मानके (अन्नपदार्थ मानके व ॲडिटिव्ह नियम), २०११ मधील नियम २.१.११ नुसार ठपनीरठ हे केवळ दुधापासून बनविलेले पदार्थ आहे. परंतु ठचीज ॲनालॉगठ हा दूध व्यतिरिक्त इतर खाद्यतेल, स्टार्च, इमल्सिफायर व इतर घटक वापरून बनविलेला पदार्थ असून तो पनीरसारखा दिसतो पण ठपनीरठ नाही. एफएसएसएआयच्या मानकांनुसार हा ठचीज ॲनालॉगठ या प्रकारात मोडतो.



अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांच्या निदर्शनास आले आहे की काही रेस्टॉरंट/ केटरर्स/ हॉटेल्स/फास्ट फूड विक्रेते या आस्थापनांमध्ये अन्न पदार्थ तयार करताना चीज ॲनालॉगचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येत असून याबाबत सदर आस्थापनांकडून ग्राहकांना पुरेशी माहिती उपलब्ध करून देण्यात येत नसल्यामुळे ग्राहकांची दिशाभूल व फसवणूक होत असल्याचे आढळून आले आहे. तसेच बाजारात काही ठिकाणी ठनॉन डेअरी चीजठ, ठचीज ॲनालॉगठ, व्हेज चीज पदार्थ किंवा 'चीज' या नावाने किंवा तत्सम नावाने विक्री केली जात आहे, ज्यामुळे ग्राहकांची दिशाभूल होत आहे.

**अन्न सुरक्षा व मानके कायद्यातील तरतुदी :**

अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम १८ (२) (ई) नुसार उपभोक्त्यांना ते जे अन्न खातात त्याबद्दल योग्य निर्णय घेण्यासाठी अन्न पदार्थांबाबत माहिती असणे आवश्यक आहे. तसेच अन्न सुरक्षा मानके (Laebòing and Displayed Regulation) २०२० मधील chapter ३ मधील नियम २(ई) नुसार अन्न पदार्थांची ग्राहकांना विक्री करताना, पोषण संबंधित माहिती आणि त्यातील घटकांची माहिती, तसेच आरोग्य संदर्भात प्रकटन करणे आवश्यक आहे.

राज्य परवानाधारक चीज ॲनालॉगचे उत्पादक/पुरवठादार यांनी चीज ॲनालॉग विक्री/पुरवठा करताना Food Safety and Standards Act, 2006 च्या कलम २३ मधील तरतुदीनुसार अन्नपदार्थाचे पॅकेजिंग व लेबलिंग करताना ग्राहकांची फसवणूक होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे. तसेच Food Safety and Standards (Laebing and Displayed) Regulations, 2020 (Generaled Laebing Refuirements) नुसार विक्री केले जाणारे चीज ॲनालॉग हे स्पष्टपणे दर्शविणे बंधनकारक आहे. रेस्टॉरंट/ हॉटेल्स/ केटरर्स/फास्ट फूड विक्रेते या आस्थापनांनी जर चीज ॲनालॉग वापर करून अन्न पदार्थ तयार केले असतील तर त्याची विक्री करताना त्याबाबत स्पष्ट माहिती देणे आवश्यक आहे.

करताना मेन्युफॅक्चर/इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड इत्यादी वर सदर अन्न पदार्थ स्पष्टपणे प्रदर्शित करणे आवश्यक आहे.

**ग्राहकांनी घ्यावयाची काळजी :**

'''१. पनीर खरेदी करताना पॅकेज उत्पादनावरील लेबल काळजीपूर्वक तपासावे.

२. रेस्टॉरंटमध्ये पनीर खरेदी करताना विक्रेत्याकडे ते शुद्ध दुधापासून बनवलेले आहे का याची खात्री करावी. तसे नसल्यास टाळावे.

३. हॉटेलमधील मेनूकार्डवर पनीर व चीज ॲनालॉग हे दोन स्वतंत्र अन्न पदार्थ आहेत का याची खात्री करावी व त्याप्रमाणेच आवश्यक माहिती घेऊनच पदार्थ निवडावा.

४. ॲनालॉग हा आरोग्यास अपायकारक नसला तरी त्यातील घटक व पोषणमूल्ये पनीरपेक्षा वेगळी असतात. त्यामुळे ग्राहकांनी फसवणूक टाळण्यासाठी योग्य माहिती असणे आवश्यक आहे.'''

**अन्न व्यवसायिकांना निर्देश :**

राज्यातील रेस्टॉरंट/ केटरर्स/ हॉटेल्स/फास्ट फूड विक्रेते/चीज ॲनालॉगचे उत्पादक/पुरवठादार यांनी कायद्यातील तरतुदींचे उल्लंघन केल्याचे आढळल्यास त्यांच्यावर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम २००६, नियम व विनियम अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येईल.

हॉटेल/रेस्टॉरंट चालकांनी पनीर ॲनालॉग व चीज ॲनालॉग उत्पादनांचा वापर करून तयार केलेल्या पदार्थांची विक्री करताना सदर अन्न पदार्थाचे स्पष्टपणे उल्लेख करणे आवश्यक आहे.

ज्या अन्न व्यवसायिकांनी अन्न परवाना घेतला त्यावेळी त्यांनी जो मोबाईल/फोन संपर्क क्रमांक दिलेला आहे, त्या क्रमांकावर प्रशासनाकडून हॉटेल/रेस्टॉरंट चालकांना पनीर व चीज ॲनालॉग संदर्भात उपरोक्त नमूद करावयाचे कार्यवाही संदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच, ज्या अन्न व्यवसायिकांनी परवाना घेताना स्वतःचा ई-मेल आणि मोबाईल क्रमांक दिलेला नाही व कोणत्या अन्य व्यक्तीचा मेलआयडी आणि मोबाईल नंबर दिलेला आहे, अशा अन्न व्यवसायिकांना स्पष्ट सूचना देण्यात येत आहे की त्यांनी तात्काळ आपल्या परवाना नोंदणीमध्ये स्वतःचा मेलआयडी आणि मोबाईल नंबर टाकावा अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन ग्राहकांच्या आरोग्याबाबत दक्ष असून अन्नातील भेसळ व दिशाभूल करणाऱ्या प्रकारांना आळा घालण्यासाठी कटिबद्ध आहे.

ग्राहकांनी अशा प्रकारची दिशाभूल झाल्यास त्याबाबत तक्रार प्रशासनाच्या १८००-२२२-३६५ या टोल फ्री क्रमांकावर नोंदवावी असे आवाहन अन्न सुरक्षा आयुक्त श्रीधर डुबे-पाटील यांनी जनतेस केले आहे.

# महिला आरक्षण : नीती व नियत...!

*देशात लोकसभा व विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याची नीती ही न्याय्य असून महिलांचा राजकारणातील हिस्सा वाढविण्याचा प्रयत्न महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने फार मोलाचा आहे. मात्र महिला आरक्षणाबाबत नीती आणि नियत मध्ये फरक असल्यामुळे आजपर्यंत महिला आरक्षणाचा प्रश्न लोंबकळत राहिला आहे. म्हणजे देशातील कोणत्याही राजकीय पक्षाला राजकारणात महिलांना आरक्षण असावे असे मनापासून वाटत नाही असेच म्हणावे लागेल. मात्र महिला आरक्षण मुद्द्याचा सोयीस्करपणे आपल्या राजकीय स्वार्थासाठी वापर करणे आणि त्याआडून विरोधकांवर निशाणा साधने व आपला कपटी डाव खेळणे ही दुटप्पी नीती सातत्याने अवलंबिली जात आहे, ही देशाच्या राजकारणाची फार मोठी वैचारिक दिवाळखोरीच म्हणावी लागेल.*



वास्तविक पाहता देशात महिलांची लोकसंख्या ५० टक्के आहे त्यामुळे प्रत्येक क्षेत्रात महिलांना अर्धा वाटा मिळणे अपेक्षित आहे. परंतु भारतात पुरुष प्रधान संस्कृती खोलवर रुजली असून पुरुषी अहंकार व वर्चस्व गाजविण्याची मानसिकता कायम आहे. परिणामी महिला कितीही सक्षम व कार्यक्षम असल्या तरी त्यांना दुय्यम व भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते हे वास्तव आहे.

**लोकसभेत महिला खासदारांची संख्या:** १९५२ च्या पहिल्या लोकसभेपासून ते २०२४ च्या १८ व्या लोकसभेपर्यंत महिला खासदारांच्या संख्येत हळूहळू वाढ झाली आहे. पहिल्या लोकसभेच्या निवडणुकीत २२ ते २४ महिला खासदार निवडून आल्या होत्या, जे एकूण सदस्य संख्येच्या केवळ ४.४ टक्के ते ४.९ टक्के इतके होते. १९७७ मध्ये सहाव्या लोकसभेत ही संख्या सर्वात कमी म्हणजे फक्त १९ होती. मात्र महिलांमध्ये राजकीय जागृती वाढत गेल्यामुळे २०१९ च्या १७ व्या लोकसभेत सर्वाधिक ७८ महिला खासदार निवडून आल्या होत्या. तर २०२४ च्या १८ व्या लोकसभेत महिला खासदारांची संख्या ७४ आहे. याचा अर्थ महिला खासदारांची संख्या वाढती आहे पण त्याचे प्रतिनिधित्व अजूनही १५ टक्केच्या खालीच आहे.

**महिला आरक्षणाच्या मागणीचा आणि विधेयकाचा इतिहास:** भारतात इंग्रजी राजवटीत १९३१ साली सरोजिनी नायडू, बेगम शाह नवाज आणि ताराबाई मोडक यांनी ब्रिटीश पंतप्रधानांना पत्र लिहून राजकारणात महिलांना समान अधिकार व संधींची मागणी केली होती.

देश स्वतंत्र झाल्यानंतर १९७४ च्या 'टुवर्ड्स इक्वॅलिटी' अहवालात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली होती. त्यानुसार १९९२ साली भारतीय संविधानात ७३ व्या आणि ७४ व्या घटनादुरुस्तीद्वारे संपूर्ण देशात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी किमान एक-तृतीयांश म्हणजे ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद करण्यात आली. यासाठी महाराष्ट्राने पुढाकार घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण देऊन सत्तेत समान वाटा देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला.

पुढे १९९६ साली लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांना किमान ३३ टक्के आरक्षण लागू करण्यासाठी देवेगौडा सरकारच्या काळात पहिले महिला आरक्षण विधेयक संसदेत सादर झाले, परंतु ते मंजूर होऊ शकले नाही.

त्यानंतर १९९८, १९९९, २००३ साली हे विधेयक पुन्हा मांडण्याचे प्रयत्न झाले, पण राजकीय सहमती अभावी ते अयशस्वी ठरले. २००८-२०१० मध्ये मनमोहन सिंग सरकारच्या काळात महिला आरक्षण विधेयक राज्यसभेत मंजूर झाले, परंतु लोकसभेत प्रलंबित राहिले. शेवटी १९ सप्टेंबर २०२३ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 'नारी शक्ती वंदन अधिनियम' अंतर्गत नवीन महिला आरक्षण विधेयक लोकसभेत मांडले, जे संसदेच्या विशेष सत्रात मंजूर झाले.

**महिला आरक्षण व सरकारची नियत :**

एनडीए सरकारने २०२३ मध्ये १०६ व्या घटनादुरुस्तीने ठनारी शक्ती वंदन अधिनियम २०२३ठ संसदेत मंजूर करून लोकसभा, राज्य विधानसभा आणि दिल्ली विधानसभेत महिलांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याची तरतूद केली. हा कायदा संमत झाल्यानंतर महिला आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी होईल अशी अपेक्षा होती आणि जर सरकारची नियत साफ असती तर २०२४ पासून त्याची अंमलबजावणी केल्या जाऊ शकली असती. पण सरकारने २०२३ मध्ये संमत केलेल्या कायद्याची अंमलबजावणी २०२९ पासून करायचा निर्णय घेतला. त्यासाठी पुन्हा घटनादुरुस्ती विधेयक १३१ वे संशोधन लोकसभेत मांडून त्यावर चर्चा करण्यात आली मात्र या संशोधनाच्या बाजूने दोन तृतीयांश मतदान न मिळाल्यामुळे ते नामंजूर झाले.

**महिला आरक्षणासाठी मतदारसंघ पुनर्रचनाच का?**

वास्तविक पाहता सरकारने जर फक्त महिला आरक्षण संविधान दुरुस्ती विधेयक संसदेत मांडले असते तर ते मंजूर झाले असते आणि महिलांच्या आरक्षणाचा प्रलंबित प्रश्न निकाली निघाला असता. पण सरकारला महिला आरक्षणाच्या आडून परिसीमन विधेयक २०२६ व केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक २०२६ संमत करून घ्यायचे होते. म्हणजे महिला आरक्षण लागू करण्यासाठी आत्ताच लोकसभेची सदस्य संख्या ८५० पर्यंत व विधासभा सदस्य संख्या ५० टक्के पेक्षा जास्त वाढविण्याचा अट्टाहास का? असा प्रश्न निर्माण होणे साहजिक आहे. याचा अर्थ सरकारला महिला आरक्षण महत्त्वाचे नाही तर त्या आडून आपली ठएक देश, एक निवडणूक व एकच पक्षठ या धोरणाची अंमलबजावणी करून एकपक्षीय सत्ता कायम करून देशात अधिकृतपणे हुकूमशाही लागू करायची आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**मतदार संघाची पुनर्रचना आणि जनगणना:** देशात २०२१ मध्ये जनगणना व्हायला पाहिजे होती. पण ती झाली नाही. आता सरकारने २०२६ व २०२७ मध्ये जनगणना करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे ही जनगणना पूर्ण झाल्यानंतरच मतदार संघाची पुनर्रचना करणे व त्यात महिलांसह जातीनिहाय लोकसंख्येनुसार सर्व मागास जातींना उचित प्रतिनिधित्त्व देणे काळाची गरज आहे. मात्र सरकार २०११ च्या जनगणनेनुसार मतदार संघाची पुनर्रचना करणार असे दिसते. म्हणजे जवळपास १५ ते १६ वर्षातील भौगोलिक व लोकसंख्येतील बदल लक्षात न घेता पुनर्रचना करणे हा अन्याय नाही का?

**महिला आरक्षण आणि राजकीय स्वार्थ:**

देशात प्रत्येक राजकीय पक्ष आरक्षणाचे राजकारण करतो ही फार खेदाची बाब आहे. आताही महिला आरक्षणाचे राजकारण होत आहे. कारण महिलांना आरक्षण देण्याचा कायदा २०२३ मध्ये संमत झाला पण त्याची अंमलबजावणी २०२९ मध्ये केली जाईल आणि त्यासाठी मतदार संघाची पुनर्रचना करण्याचा मार्ग मोकळा होईल जेणेकरून आपले विद्यमान खासदार व आमदारांना संरक्षण तर दिले जाईलच पण पुनर्रचनेमध्ये उत्तर भारतातील राज्यांना दक्षिण भारतातील राज्यांपेक्षा जास्त जागा राहतील आणि महिलांची देखील आपल्या पक्षाला साथ मिळेल व आपला पुढचा मार्ग प्रशस्त होईल या हेतूने सरकारने महिला आरक्षण बिल लोकसभेत मांडले. पण सरकारची ही खेळी फसली. त्यामुळे आता एनडीएचे मंत्री, खासदार, आमदार हेतूतः विरोधी पक्षांवर खापर फोडून त्यांना महिला आरक्षण विरोधी ठरवत आहेत.

**मतदारसंघ पुनर्रचनेत देश हित आहे का?**

भारतीय संविधानातील तरतुदीनुसार लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची पुनर्रचना दर दहा वर्षांनी जनगणनेनंतर होणे अपेक्षित असते. त्यासाठी संसदीय कायद्यानुसार 'परिसीमन आयोग' नेमला जातो. सध्याची पुनर्रचना २००१ च्या जनगणनेनुसार २००२ मध्ये झाली होती, त्यानंतर २०११ आणि २०२१ मध्ये ही पुनर्रचना व्हायला पाहिजे होती. मात्र ती झाली नाही आणि २०२१ मध्ये जनगणनाही करण्यात आली नाही. मात्र आता २०२६ नंतर नवीन पुनर्रचना करण्यासाठी आयोग स्थापन करायचा आहे. त्यासाठी २०११ च्या जनगणनेचा आधार घेतला जाईल असे घोषित केले आहे. पण २००१ च्या जनगणेपासून पुनर्रचना झाली नाही ती आताच करण्याचा निर्णय का घेतला गेला. गेल्या २५ वर्षात

पुनर्रचना झाली नाही तरी काही फरक पडला नाही. म्हणून सध्या देशाची आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती पाहता पुनर्रचना पुढे ढकलणे देश हिताचे आहे. कारण लोकसभा व राज्य विधानसभांच्या सदस्य संख्येत वाढ केली तर सरकारी तिजोरीवर जवळपास पन्नास हजार कोटीचा भार पडेल जो देशाला व देशातील लोकांना परवडणारा नाही.

सध्या भारताच्या लोकसभेत एकूण ५४३ निवडून आलेले खासदार आहेत. राज्यघटनेनुसार ही सदस्य संख्या ५५२ असू शकते. मतदारसंघांच्या पुनर्रचनेनंतर ही सदस्यसंख्या ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे. तर संपूर्ण राज्यांची एकूण विधासभा सदस्य संख्या ४१३१ आहे. या सदस्य संख्येत ५० टक्के पर्यंत वाढ करण्याचा प्रस्ताव आहे.

गेल्या ७५ वर्षाचा इतिहास अभ्यासाला तर कोणत्याही खासदार आणि आमदारांनी आपल्या कार्यकाळात लोकांच्या समस्यांची दखल घेऊन त्या पूर्णतः सोडविण्याचा प्रयत्न केला नाही. मात्र संसदेची आणि विधिमंडळाची अधिवेशने भरविण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च केल्या गेले. तसेच सर्व आमदार व खासदारांचे वेतन व भत्ते अमाप वाढवून देशाच्या व राज्यांच्या तिजोरीवर प्रचंड भार पडला आहे. त्यामुळे कल्याणकारी योजना व लोकांच्या मूलभूत सुविधा आजपर्यंत पूर्ण झाल्या नाहीत. त्यात आता जवळपास ४० ते ५० टक्के वाढ करून लोकांवर प्रचंड आर्थिक भार टाकायचा. यात देशाचे हित कुठं आहे? केवळ मतदार संघाची पुनर्रचना करून विकसित भारताचे स्वप्न साकार होणार का? या प्रश्नांवर चिंतन होणे गरजेचे आहे.

**प्रा. डॉ.एम.आर.इंगळे**
सेवानिवृत्त प्रोफेसर आणि संविधान प्रचारक
तथा विभागीय सचिव डाटा अकोला

# दिनविशेष

## जागतिक हिवताप दिन २०२६



जागतिक हिवताप दिन दरवर्षी २५ एप्रिल रोजी साजरा केला जातो. हा दिवस जागतिक आरोग्य संघटनेच्या पुढाकाराने २००७ पासून सुरू करण्यात आला. याचा उद्देश हिवताप (मलेरिया) या रोगाबद्दल जागरूकता निर्माण करणे, प्रतिबंधक उपाययोजना प्रोत्साहित करणे आणि या रोगाचे उच्चाटन करण्यासाठी जागतिक पातळीवर प्रयत्न वाढवणे हा आहे.

२०२६ साठी ठहिवतापमुक्त जगासाठी एकत्र येऊयाठ हे घोषवाक्य आहे. हिवताप हा एक जीवघेणा आजार आहे, जो प्लॅझ्मोडियम नावाच्या परजीवीमुळे होतो आणि तो संक्रमित अनॉफिलीस मादी डासांच्या चाव्यामुळे पसरतो. विशेषतः उष्ण आणि दमट प्रदेशांमध्ये हा आजार मोठ्या प्रमाणावर आढळतो. भारतासारख्या देशांमध्येही हिवताप ही एक गंभीर सार्वजनिक आरोग्य समस्या आहे.

या रोगाची प्रमुख लक्षणे म्हणजे ताप, थंडी वाजणे, घाम येणे, डोकेदुखी आणि अशक्तपणा. योग्य वेळी उपचार न केल्यास हिवताप प्राणघातक ठरू शकतो. मात्र, योग्य औषधोपचार आणि प्रतिबंधात्मक उपायांमुळे हा रोग पूर्णपणे बरा होऊ शकतो.

हिवताप रोखण्यासाठी खालील उपाय अत्यंत महत्त्वाचे आहेत: डासांची उत्पत्ती होऊ न देणे (साचलेले पाणी टाळणे), झोपताना मच्छरदाणीचा वापर करणे, पूर्ण अंग झाकणारे कपडे घालणे,

घराभोवती स्वच्छता राखणे. जागतिक हिवताप दिन आपल्याला आठवण करून देतो की, हा आजार केवळ आरोग्याचा प्रश्न नाही तर सामाजिक आणि आर्थिक विकासालाही अडथळा ठरतो. म्हणूनच शासन, आरोग्य संस्था आणि नागरिकांनी मिळून या आजाराविरुद्ध लढा देणे अत्यंत गरजेचे आहे.

हिवतापमुक्त जग निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून प्रतिबंधात्मक उपाय पाळणे आवश्यक आहे. जागरूकता आणि सहकार्य यांच्या बळावर आपण नक्कीच हिवतापाचा पूर्णतः नायनाट करू शकतो.

**बाळासाहेब घुगे**
जिल्हा विस्तार व माध्यम
अधिकारी जिल्हा परिषद अकोला

## साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर ८३९०६७०९९९ या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## कर्तव्यदक्ष पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवावे -प्रतीक्षा वासनिक

**अकोला :** संकल्प बहुद्देशीय संस्था अकोला यांच्यातर्फे कर्तव्यदक्ष राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याचे आयोजन शेगांव येथे करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील आपल्या कार्यास एकनिष्ठ असणाऱ्या, सामाजिक, पोलीस, सरपंच, कृषी, क्रीडा, उद्योग, शैक्षणिक, संस्था, प्रशासकीय, कला व अन्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या लोकांना हा कर्तव्यदक्ष राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा मे महिन्यात शेगांव येथे पार पडणार आहे अशी माहिती कार्यक्रम मुख्य आयोजक प्रतीक्षा वासनिक यांनी दिली. पुरस्कार प्रस्ताव अधिक माहितीसाठी ९१७३८५७९२६६० वर सपंर्क करावा असें आवाहन प्रतीक्षा वासनिक यांनी केले आहे.

## कुऱ्हाड व चाकूने हल्ला प्रकरणी आरोपीचा जमानत अर्ज फेटाळला

**अकोट :** तेल्हारा तालुक्यातील भांडणाच्या कारणावरून कुऱ्हाड व चाकूने प्राणघातक हल्ला करणारा आरोपी बजरंग पाथ्रीकर याचा जमानत अर्ज अकोट सत्र न्यायालयाचे न्यायाधिश आर.आर. पठारे यांनी फेटाळून लावला.

तेल्हारा पोलिस स्टेशनच्या फाईलवरील आरोपी बजरंग किसनराव पाथ्रीकर (३३) रा. पाथर्डी याने भांडणाच्या कारणावरून जीवे मारण्याच्या उद्देशाने कुऱ्हाड व चाकूने वार केल्याच्या प्रकरणात दाखल केलेला जमानत अर्ज न्यायालयाने नामंजूर केला आहे. सदर आरोपी हा दि.१७/८/२०२४ पासून अकोला कारागृहात आहे. सरकारी वकील अजित देशमुख यांनी जमानत अर्जाला विरोध करतांना न्यायालयात लेखी उत्तर व युक्तीवाद सादर केला. आरोपी व फिर्यादी एकाच गावात राहतात. सदर प्रकरणामध्ये दोषारोपपत्राचे अवलोकन केले असता साथीदाराचे बयाण, इतर कागदपत्रे पाहता आरोपीला शिक्षा होण्याइतपत पुरावा दोषारोपपत्रात उपलब्ध आहे. आरोपीला कारागृहात ठेवून सरकार पक्ष हा खटला जलदगतीने चालविण्यास तयार आहे. त्यामुळे या आरोपीचा जमानत अर्ज नामंजूर करण्यात यावा, असा युक्तीवाद सरकारी वकील अजित देशमुख यांनी केला. दोन्ही पक्षांच्या युक्तीवादानंतर न्यायालयाने आरोपीचा जमानत अर्ज नामंजूर केला.

## अकोट फाईल मध्ये घर, दुकानावर दगडफेक

### संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

**अकोला:** अकोटफाईल पोलिस स्टेशनच्या हद्दीत शंकर नगर परिसरात गुरूवारी मध्यरात्री अज्ञात गुंडांनी किराणा दुकान व घरावर दगडफेक केली. त्यामुळे परिसरात धावपळ झाली. हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला. शुक्रवारी सकाळी आरोपींनी पुन्हा येऊन ठरिपोर्ट मागे घ्या, नाहीतर खून करतोठ अशी उघड धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

प्राप्त माहितीनुसार, शंकर नगरातील एका किराणा दुकानावर व शेजारच्या घरावर मध्यरात्री काही अज्ञात इसमांनी अचानक दगडफेक केली. या घटनेमुळे परिसरात मोठा गोंधळ उडाला. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या प्रकरणात अकोटफैल पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केल्याची माहिती मिळत आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असून, लवकरच त्यांना अटक केली जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# गाडेगाव ग्रामपंचायतीत गैरव्यवहार?

### ♦ निधी अपहाराची चौकशीची मागणी

प्रतिनिधी २५ एप्रिल

**तेल्हारा:** तालुक्यातील गाडेगाव ग्रामपंचायतीमध्ये मागील काही वर्षांपासून विविध शासकीय योजनांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत नागरिकांनी आपले सरकार वर अधिकृत तक्रार दाखल केली असून प्रशासनाकडे सखोल चौकशीची मागणी केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायत हद्दीतील नोंद नसलेल्या तसेच अतिक्रमण असलेल्या जागेवर काही लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आले. संबंधित लाभार्थ्यांना संपूर्ण निधी देखील वितरित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ग्रामस्थांचा आरोप आहे की, संबंधित जागा ग्रामपंचायत नोंदीमध्ये नसताना आणि त्या जागेच्या मालकीबाबत स्पष्टता नसताना पंचायत स्तरावर पंचनामा करून लाभ मंजूर करण्यात आला.

यासंदर्भात ग्रामसेवकाला अनेक वेळा विचारणा करण्यात आली, मात्र समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. तसेच गेल्या १४ महिन्यांपासून अतिक्रमण हटविण्याबाबत अर्ज देऊनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा आरोपही करण्यात आला आहे.

पंचायत समितीकडे दोन ते तीन वेळा तक्रारी करूनही प्रकरणाची चौकशी झाली नसल्याने ग्रामस्थांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे खालील मागण्या केल्या आहेत: संबंधित जागेची प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी जागेच्या मालकीची पडताळणी करण्यात यावी अवैध बांधकाम व अतिक्रमण हटविण्यात यावे. चुकीच्या पद्धतीने घरकुल मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी अशी मागणी आहे.

## भीम गीते व फुले गीतांच्या साथीने जयंती साजरी

प्रतिनिधी २५ एप्रिल




**अकोट:** जळगाव नहाटे येथे समाज बांधवांनी बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले यांच्या जीवन आधारित गीतांचा बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, प्रमुख उपस्थिती अध्यक्ष राजेश वानखडे संजय वानखळे भगवान वानखडे रामदास शेगोकार, उमेश हाडोळे, रवींद्र खलोकार कार अवधूत पवार भरतरी उबाळे, राजेश वानखडे, रोशन नितोने गावातील प्रतिष्ठित नागरिक गावकरी मंडळी गावातील महिला मंडळी तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक निखिल वानखडे यांनी पार पाडले संचालन यावेळी गावातील नागरिकांनी कार्यक्रमाचा अनामिका वानखडे व निकिता वानखडे यांनी केले व विदानंद म्युझिकल चे रजनीताई भवानी त्यांच्यासोबत त्यांची टीम भगवान बाबुळकर अमोल पोहुरकर, अजय दांडगे, विश्वजीत वानखडे, डान्स राजनंदनी वानखडे, स्वरांशी वानखडे, प्राजक्ता वानखडे प्राजक्ता इंगळे, प्रणाली थोरात, प्रांजली थोरात, दिविजा वानखडे, आराध्या सदाशिव, तसेच प्रस्तावना निखिल वानखडे साऊंड सिस्टिम आशिष वानखडे आभार दीपरत्न वानखडे जयंती उत्सव कार्यक्रमाचे आयोजक सम्यक दृष्टी बहुद्दिष्ट सेवाभावी शिक्षण संस्था जळगाव नाटे यांच्या पुढाकारात कार्यक्रम शांततेत पार पडला.

## १५ फूट अजगराने शेतकऱ्यांचे काम बंद पाडले

### ♦ वन्यजीव रक्षक बाळ काळणे यांनी अजगराला पकडले

प्रतिनिधी २५ एप्रिल



**अकोला:** म्हैसपुर शेत शिवारात शेती सपाटीकरणाचे काम शेतकरी करीत आहेत. या कामात १५ फूट अजगराने गुरूवारी अडथळा आणला. अनेक शेतकरी काम बंद करून घरी गेले. रात्री चालणारे काम अजगरामुळे बंद होऊ नये म्हणून सर्पमित्र तथा मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणे यांना माहिती दिली. ते सहका-या सोबत पोहोचले आणि अजगराला पकडले तसेच शेतकऱ्यांची भितीतून सुटका केली.

वनविभागाची टीम म्हैसपुरला पोहोचली. अजगर लपलेल्या जागी अंधार होता. जागा चढ उतार व भुसभूशीत मातीत पाय फसत असल्यावरही टॉर्चच्या उजेडात महाकाय अजगर बाळ काळणे यांनी पकडला. तुषार आवारे यांनी मोलाची मदत केली. अंधारात अजगर हे गतिमान होतात. अशा अनेक प्रसंगाचा अनुभव बाळ काळणे यांना आहे. त्यामुळे त्यांनी योग्य नियोजन केले. बाळ काळणे यांनी ७० वर अजगर सुरक्षित केले आहेत. कॅन्सर मुळे ७९ टक्के दिव्यांग असले तरी बाळ काळणे हे कोणताही वन्यजिव वाचवतांना त्यांचा आत्मविश्वास दांडगा असतो. शेतकरी प्रकाश शेळके , महादेव मानकर, दत्ता मानकर, अमोल डेहनकर; राम शेळके, प्रणव निकोले, शाम शेळके यांनी हा थरारक रेस्कुचाअनुभव घेतला.

## शिवाजी महाराजांविषयी बागेश्वर बाबांच्या वक्तव्यावर संताप

### ♦ जावेद जकरिया यांनी केला तीव्र निषेध

प्रतिनिधी २५ एप्रिल



**अकोला :** नागपूरच्या जामठा परिसरात आयोजित 'भारत दुर्गा शक्तिपीठ' शिलान्यास सोहळ्यात बागेश्वर धामचे पीठाधीश्वर धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी केलेल्या वक्तव्यावर तीव्र प्रतिक्रिया उमटत असून विविध स्तरांतून निषेध व्यक्त करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाला सरसंघचालक , मुख्यमंत्री , केंद्रीय मंत्री यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान बागेश्वर बाबा यांनी आपल्या भाषणात असे म्हटले की, ङ्कशिवराय युद्ध लढून थकले होते आणि त्यांनी समर्थ रामदास स्वामींना राजपाट सोपवला होता. आता मला विश्रांती हवी आहे आणि राज्य आपण चालवा, असे त्यांनी सांगितले होते.ङ्ग या वक्तव्यामुळे शिवप्रेमी आणि विविध सामाजिक संघटनांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

या पार्श्वभूमीवर अकोल्याचे सामाजिक कार्यकर्ते तथा जकरिया फाउंडेशनचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे या वक्तव्याचा तीव्र निषेध नोंदविला आहे. त्यांनी म्हटले आहे की, ङ्कछत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असून त्यांच्या शौर्य, पराक्रम आणि स्वराज्य स्थापनेच्या इतिहासाला धक्का पोहोचवणारे कोणतेही वक्तव्य सहन केले जाणार नाही.ङ्ग


जकरिया यांनी पुढे म्हटले की, शिवाजी महाराजांनी अखेरच्या श्वासापर्यंत स्वराज्यासाठी संघर्ष केला आणि जनतेच्या रक्षणासाठी स्वतःचे जीवन समर्पित केले. अशा महान राष्ट्रपुरुषांबाबत मनगढंत आणि इतिहासविरोधी कथा सांगून समाजात संभ्रम निर्माण करणे चुकीचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, बागेश्वर बाबा यांनी महाराष्ट्राच्या जनतेच्या भावना दुखावल्याबद्दल तात्काळ जाहीर माफी मागावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

दरम्यान, या वक्तव्यावरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चेला उधाण आले असून शिवप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

## महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाचे लोकसेवक अधिवेशन उद्या अकोल्यात

प्रतिनिधी २५ एप्रिल



**अकोला:** महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाच्या घटनेतील तरतुदीनुसार लोकसेवकांचे एक दिवसीय अधिवेशन तथा वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार २६एप्रिलला जे.आर.डी.टाटा इंग्लिश स्कूल खडकी अकोला येथे आयोजिले आहे.

या अधिवेशनाचे उद्घाटन प्रख्यात लेखक व पत्रकार श्रीमंत माने यांचे हस्ते व महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष रमेश अण्णा दाणे यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. अ.भा.सर्व सेवा संघाचे मंत्री अड.अविनाश काकडे, सर्व सेवा संघाचे मॅनेजिंग ट्रस्टी मोहम्मद शेख हुसेन ,निरीक्षक प्रतिनिधि भूपेश भूषण अनुपपुर भूदान मंडलाचे सचिव एकनाथ डगवार, भूदान मंडलाचे संयुक्त सचिव नरेंद्र बैस, सर्व सेवासंघाचे विश्वस्त सोमनाथ रोडे, आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी प्रशांत गावंडे(अध्यक्ष, शेतकरी जागर मंच) महेन्द्रबाबू गोयनका (ज्येष्ठ गांधी वादी) यांची प्रमुख उपस्थिती राहील. दुपारच्या सत्रात पुढील तीन वर्षांकरिता कार्य संकल्प करण्यात येईल.अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सायंकाळी ६ वाजता सर्वोदय चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरणाऱ्या 'गांधी विचार दर्शन व व्यसनमुक्त भारत 'प्रदर्शनीचे उद्घाटन विजय कौसल, कामगार नेते प्रदीप वखारिया, डॉ.झीशान हुसेन, रेडक्रॉस अकोलाचे सचिव प्रभजितसिंह बच्छेर यांच्या उपस्थितीत होईल. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन स्वागताध्यक्ष प्रा.डॉ.विवेक हिवरे, सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड, ज्येष्ठ सर्वोदयी महादेवराव भुईभार, डॉ.शि.ना.ठाकुर, सचिव डॉ.मिलिंद निवाणे, श्याम शर्मा, संयोजक अनिल मावळे, भाऊराव गावंडे, आत्माराम शेळके, जयप्रकाश वाकोडे, नितीन भरणे, महेश आढे यांनी केले आहे.

## श्री सनातन धर्मसभा पुस्तकालयात जागतिक पुस्तक दिवस साजरा

प्रतिनिधी २५ एप्रिल




**अकोला:** स्थानिक श्री सनातन धर्मसभा पुस्तकालयात संस्थेचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत जागतिक पुस्तक दिवस साजरा केला. सर्वप्रथम सरस्वती पूजन तसेच दिपप्रज्वलन केले.

प्रमुख अतिथी हंसराज अग्रवाल यांचे स्वागत सज्जन अग्रवाल यांनी केले. डॉ. सत्यनारायण बाहेती यांचे स्वागत रमाकांत खंडेलवाल यांनी केले. निकेश गुप्ता यांनी ग्रंथालय बद्दल माहिती दिली. तसेच शेक्सपियर सारख्या लेखकांना श्रद्धांजली

देण्यासाठी यूनेस्को ने २३ एप्रिल हा दिवस विश्व पुस्तक दिवस म्हणून घोषित केला असे सांगितले.

सत्यनारायण बाहेती म्हणाले, पुस्तकांचे आपल्या जीवनात अनन्य साधारण महत्व आहे. पुस्तके वाचल्याने विचारात प्रगल्भता येते. पुस्तके वाचल्याने ज्ञानाची वृद्धी होते तसेच आत्मविश्वास वाढतो.

हंसराज अग्रवाल यांनी पुस्तकालयाचे महत्व स्पष्ट केले. अशोक रामटेके, रमाकांत खंडेलवाल यांनी विचार व्यक्त केले. लक्ष शर्मा यांनी सांगितले, आयुष्यात प्रगती करण्यासाठी कम्फर्ट झोन च्या बाहेर निघणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. सुरेशचंद्र अग्रवाल तसेच आभार प्रदर्शन श्री श्रीकांत गोयनका यांनी केले.

कार्यक्रमाला विकास रामटेके, रेवत खाडे, मोहीम देशमुख, वाय. ए. शेख, राजकुमार शर्मा, रमेश पगारे, गजानन मापारी, राधेश्याम शर्मा, डॉ. मिलिंद निवाणे, व्यंकटस्वामी पागडे, राजाभाऊ गायकवाड, रमेश जैन, विनोद खंडेलवाल, विठ्ठल मानकर, आयुष

अग्रवाल, शैलेश अलिमचंदाणी, चंद्रशेखर देठे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल आरती पोतदार, सहाय्यक ग्रंथपाल ऐश्वर्या पाटोळे, लिपिक देवेंद्र राठोड, सेवक सुरेश अग्रवाल यांनी प्रयत्न केले.

## गोमाता सन्मान अभियान पूर्व नियोजन बैठक उत्साहात संपन्न



प्रतिनिधी २५ एप्रिल

**पातुर :** गोमातेला सन्मान मिळावा तसेच तिला 'राष्ट्रमाता'चा दर्जा मिळावा या मागणीसाठी देशभर सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पातुर येथे गोमाता सन्मान अभियानाची पूर्व नियोजन बैठक उत्साहात पार पडली. ही बैठक संत श्री सिदाजी महाराज मंदिराच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. बैठकीदरम्यान गोमाता सन्मान अभियानांतर्गत विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करून आगामी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. तसेच अभियानासाठी आवश्यक असलेल्या पूर्वपरवानगीकरिता माननीय तहसीलदार तथा ठाणेदार, पातुर यांना निवेदनही देण्यात आले.

या अभियानाच्या अनुषंगाने दिनांक २७एप्रिल २०२६ (सोमवार) रोजी सकाळी ९ वाजता संत श्री सिदाजी महाराज सभा मंडप येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व जागरूक देशभक्त व गोभक्तांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

या बैठकीस संजुभाऊ यादव, संजय गाडगे, सचिनभाऊ बारोकार, नानासाहेब देशमुख, श्री श्री १०८ श्री महंत गणेशानंदगिरी महाराज, श्री नवनाथ महाराज गोशाळा चॅरिटेबल ट्रस्ट पातुरचे प्रतिनिधी, अनंता बगाडे (बालुभाऊ), राजुभाऊ उगले, सुभाष हिरळकर, नंदकिशोर आमले, डॉ. श्रीकांत बोरकर (वनराई गोरक्षण), अशोक उगले आदी मान्यवर उपस्थित होते.

## किकबॉक्सिंग स्पर्धेत सेंट पॉल्स पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी ५० पदके पटकावली

प्रतिनिधी २५ एप्रिल



**अकोट:** किकबॉक्सिंग स्पोर्ट्स असोसिएशन अकोलाच्या वतीने आयोजित अकोला जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप २०२६ डॉ.बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठान, अकोला येथे आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेत शहरी व ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने खेळाडूंनी सहभाग घेतला होता. तसेच स्पर्धेत सेंट पॉल्स पब्लिक स्कूल अकोट येथील २८ खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता.

त्यामध्ये ७,८,९ वयोगटात - २१ किलो वजनगटात लाईट कॉन्टॅक्ट व किकलाईट प्रकारांमध्ये सोहम वारुळकर २ सुवर्णपदक २७ किलो वजन गटात मोहम्मद अजफार हुसैन २ सुवर्णपदक २३ किलो व २७ किलो वजनगटात श्रीजीत ठोकळ १सुवर्ण १रौप्य ३६ किलो वजनगटात आनंद ओहेकर २ सुवर्णपदक तसेच मुलींमध्ये २४ किलो वजनगटात कासवी गुप्ता १ सुवर्ण १ रौप्य ३३ किलो वजन गटात आरुषी सावीकार २ सुवर्ण तसेच १०,११,१२ वयोगटात २८ किलो वजनगटात चिन्मय झामरे २रौप्य ३२ किलो वजनगटात प्रसेनजित ओइंम्बे १रौप्य १कांस्य ३२ किलो मध्ये अर्णव थारकर २कांस्य ३२ किलो मध्ये शिवम बोले १ रौप्य १कांस्य ३७ किलो वजनगटात अंशुमन चव्हाण १सुवर्ण १रौप्य ३७किलो वजनगटात सानिध्य भागवतकार १कांस्य ४२ किलो वजनगटात राजवीर साबळे २सुवर्ण ४२ किलो वजनगटात प्रियांशू मोकळकर २ रौप्य कार्तिक पवार २ कांस्य ४७ किलो वजनगटात उदय खिरोडकर १सुवर्ण १रौप्य धनंजय कुकडे १ सुवर्ण १रौप्य दर्शन खोले १ सुवर्ण १ कांस्य निकुंज भगत १रौप्य १कांस्य ३५ किलो वजनगटात किकलाईट प्रकारांमध्ये युग नवलकर १ सुर्वण निरव ढोकणे १रौप्य तसेच मुलींमध्ये ईश्वरी लावडे ३२ किलो वजन गटात २सुवर्ण ईरा वसू २ रौप्य) ४७ किलो मध्ये नेहा खोले २सुवर्ण श्रद्धा गहले २ रौप्य ४७ किलो वजनगटात सेजल पारधी १ सुर्वण १ रौप्य द्रिती पाखरे १ सुवर्ण १ रौप्य १३,१४,१५ वयोगटात ६९ किलो वजनगटात देवाशीष चिकटे २ सुवर्ण या खेळाडूंनी प्रतिस्पर्धी खेळाडूंना पराभूत करून २५ सुवर्ण,१७ रौप्य, ८ कांस्यपदक पटकावित प्रथम क्रमांकाची ओव्हर ऑल चॅम्पियनशिप मिळवली. या विजयी खेळाडूंची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेकरीता निवड करण्यात आली आहे.यशामागे शा.शिक्षक प्रशांत ठोकळ व अनंत पाचकवडे यांचे प्रशिक्षण व तांत्रिक मार्गदर्शन मोलाचे ठरले विजय प्राप्त खेळाडूंना संस्था अध्यक्ष नवनीत लखोटिया, लुनकरन डागा, प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दिपम लखोटिया, अवनी लखोटिया, प्रा.कविता मिश्रा यांनी पुष्पगुच्छ देऊन खेळाडूंचे कौतुक केले व पुढील स्पर्धेकरीता शुभेच्छा दिल्या.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# रविवारी विराट हिंदू संमेलन; शोभायात्रा व धर्मसभेचे आयोजन

## धर्मजागरणासाठी उपक्रम; महंत राजुदासजी महाराज यांचे मार्गदर्शन

प्रतिनिधी २५ एप्रिल

पुनीत मजेठीया

**आर्णी :** धर्मजागरणाच्या दिशेने नव्या ऊर्जेला चालना देण्यासाठी हिंदू सुरक्षा सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आर्णी येथे रविवारी (दि. २६ एप्रिल) दुपारी ४ वाजता विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या निमित्ताने दुपारी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार असून सायंकाळी ६ वाजता श्री म. द. भारती मैदान, शिवनेरी चौक येथे धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे.

या सभेला अयोध्या धाम येथील सिद्धपीठ हनुमान गडीचे राष्ट्रीय अध्यक्ष हिंदू सम्राट श्री श्री १००८ महंत राजुदासजी महाराज प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार



आहेत. तसेच वर्धा येथील अटल पांडे यांचेही व्याख्यान होणार आहे.

या संमेलनासाठी सुनिलजी महाराज (प्रदेश प्रभारी, महाराष्ट्र), महंत बालयोगी गोपालनाथजी (प्रदेशाध्यक्ष, संत प्रकोष्ठ), श्री शामसुंदर भारती (उपाध्यक्ष, संत प्रकोष्ठ महाराष्ट्र व आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष, जुना अखाडा) तसेच संदीप वाकडे (जिल्हाध्यक्ष, हिंदू सुरक्षा सेवा संघ, हिंगोली व महामंत्री, महाराष्ट्र) उपस्थित राहणार आहेत.

यावेळी श्री संत सदगुरु गंगेश्वर बापू (मदनापुर, किनवट), श्री श्री १००८ महंत जानेश्वर भारती महाराज (भारती आश्रम, श्रीक्षेत्र माहूर), संत सावरिया बाबा (बालाजी मंदिर, यवतमाळ), संत बाबुसिंग महाराज (पोहरादेवी), वेदानाचार्य सद्गुरू दिगांबर महाराज (भोरला मठ संस्थान, वसमत), सद्गुरु सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज (साखरखेडा, बुलढाणा), सद्गुरु शिव चैतन्य शिवाचार्य महाराज (हदगाव), विश्वचैतन्य शिवाचार्य महाराज (जालना), गुरुपादेश्वर शिवाचार्य महाराज (गिरगाव), सद्योजात शिवाचार्य महाराज (नागठाणा), काशिनाथ शिवाचार्य महाराज (पाथरी, परभणी), महंत जितेंद्र महाराज व शेखर महाराज (पोहरादेवी), तसेच संत अंबिका भारती आई (बोपापूर, वर्धा) यांच्यासह अनेक साधुसंत, महंत, योगी व सामाजिक-राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तसेच विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व इतर हिंदू संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

या धर्मसभेस जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक गजानन सागरबाई रामचंद्र केने महाराज (संत प्रकोष्ठ, विदर्भ प्रांत महामंत्री) यांनी केले आहे.

# पुसद येथे दगडाने ठेचून अज्ञात इसमाची हत्या

प्रतिनिधी २५ एप्रिल

**यवतमाळ :** यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात खंडाळा येथील गिट्टी क्रशर परिसरात अज्ञात इसमाची निर्घृण हत्या झाल्याची घटना शनिवारी सकाळी उघडकीस आली. भवानी टेकडीपासून काही अंतरावर सकाळी सुमारे ८ ते ९ वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार समोर आला. मृत इसमाचे वय अंदाजे ४० ते ५० वर्षे असून, त्याची ओळख वृत्त लिहेपर्यंत पटलेली नव्हती.

प्राथमिक माहितीनुसार, अज्ञात व्यक्तीच्या डोक्यावर दगडाने वार



करून हत्या करण्यात आली असून चेहरा विद्रूप करण्यात आल्याचेही आढळून आले आहे. घटनेची माहिती मिळताच वसंतनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार झांबरे यांच्यासह पथक घटनास्थळी दाखल झाले.

फॉरेन्सिक व्हॅननेही घटनास्थळी पाहणी केली असून पुढील तपासासाठी डॉग स्कॉड व फिंगरप्रिंट पथकाला पाचारण करण्यात आले आहे. घटनास्थळीच शवविच्छेदनाची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, मृताची ओळख पटवण्यासाठी जिल्ह्यातील बेपत्ता व्यक्तींच्या नोंदींची तपासणी केली जात आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, कालच पोफाळी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अशाच प्रकारे एका इसमाची हत्या झाल्याची घटना समोर आली होती. त्यामुळे अवघ्या २४ तासांत घडलेल्या या दोन घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर पुन्हा एकदा चिंता व्यक्त केली जात आहे.

# ‘लाडक्या बहिणीं’ना तांत्रिक अडचणींचा फटका

## तहसील, पंचायत समिती व बँकांच्या फेऱ्यांनी महिला त्रस्त

प्रतिनिधी २५ एप्रिल

संदीप रत्नपारखी

**दिग्रस :** तालुक्यात ‘लाडक्या बहिणी’ योजनेअंतर्गत अनेक पात्र महिलांचा दरमहा मिळणारा अनुदानाचा लाभ अचानक बंद झाल्याची बाब समोर आली आहे. तांत्रिक अडचणींमुळे लाभार्थ्यांना फटका बसत असून, यामुळे महिलांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

योजनेचा लाभ पुन्हा सुरू करून घेण्यासाठी महिलांना तहसील कार्यालय, पंचायत समिती तसेच विविध बँकांमध्ये वारंवार फेऱ्या




माराव्या लागत आहेत.

मात्र, इतके करूनही समस्यांचे समाधान होत नसल्याची तक्रार लाभार्थ्यांकडून केली जात आहे. स्थानिक प्रशासनाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याने महिलांचा त्रास अधिक वाढत आहे.

काही प्रकरणांमध्ये संबंधित महिलांना थेट यवतमाळ येथे जाऊन चौकशी करण्याचा सल्ला दिला जात असल्याचेही समोर आले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या महिलांसाठी हा प्रवास खर्चिक ठरत असल्याने संताप वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन संबंधित यंत्रणेला आवश्यक निर्देश द्यावेत व सर्व पात्र महिलांना नियमित अनुदान मिळेल याची खात्री करावी, अशी मागणी पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडे करण्यात येत आहे.

“योजनेचा लाभ मिळतोय की नाही यासाठी आम्हालाच दारोदार भटकंती करावी लागत आहे. प्रशासनाने मदत करण्याऐवजी टोलवाटोलवी केली जात आहे,” अशी भावना लाभार्थी महिलांनी व्यक्त केली.

गरजू महिलांसाठी सुरू करण्यात आलेली योजना तांत्रिक अडचणी व प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अडखळत असल्याचे चित्र दिसत असून, तात्काळ उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत आहे.

# फटाके घेवुन जाणाऱ्या वाहनाला आग

प्रतिनिधी २५ एप्रिल

**पुसद :** नांदेडहून पुसदकडे येणाऱ्या फटाके व इतर मालाने भरलेल्या ‘छोटा हत्ती’ वाहनाला कासोळा फाट्याजवळ शुक्रवारी दुपारी अचानक आग लागून संपूर्ण वाहन जळून खाक झाले. या घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही; मात्र लाखोंचा माल आगीत नष्ट झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वाहन (एमएच 26 बीई 9886) हे नांदेड येथील राजेश सूर्यवंशी यांचे असून, त्याद्वारे कपडा, किराणा तसेच फटाके यांची वाहतूक केली जात होती. दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास कासोळा फाट्याजवळ पोहोचताच वाहनाने अचानक पेट



घेतला. फटाक्यांचा साठा असल्याने आगीने काही क्षणांतच तीव्र स्वरूप धारण केले.

घटनेची माहिती मिळताच पुसद अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन विभाग प्रमुख राजेश शेकापुरे, चालक पवन पवार तसेच फायरमन अमन अत्राम व सारंग सानप यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. या दरम्यान काही काळ मार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणांकडून पुढील तपास सुरू आहे.

# उमरखेडमध्ये पथदिवे सकाळीही सुरूच; ग्राहक पंचायतचे नगरपरिषदेला निवेदन

प्रतिनिधी २५ एप्रिल

**उमरखेड :** शहरातील रस्त्यांवरील पथदिवे सकाळी उशिरापर्यंत सुरू राहत असल्याने वीजेचा अपव्यय होत असल्याची बाब पुढे आली आहे. याबाबत अखिल भारतीय ग्राहक पंचायत, उमरखेड शाखेच्या वतीने नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पथदिवे रात्री सुरू असणे आवश्यक असले तरी सकाळी वेळेत बंद न केल्याने सार्वजनिक निधीचा अपव्यय होत आहे. तसेच या वीज वापराचा आर्थिक भार अप्रत्यक्षपणे




नागरिकांवरच पडत असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

यावेळी ग्राहक पंचायतचे अध्यक्ष प्रा. प्रकाश देशमुख, कार्यकारी अध्यक्ष ॲड. विलासराव देवसरकर तसेच कोषाध्यक्ष यशवंत गिरी उपस्थित होते. त्यांनी पथदिवे वेळेत बंद करण्यासाठी संबंधित विभागाने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

निवेदनाची दखल घेत मुख्याधिकाऱ्यांनी तत्काळ संबंधित विभागाला सूचना देत पथदिवे नियमित वेळेत बंद करण्याचे आदेश दिले. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांना याबाबत तंबीही देण्यात आल्याचे सांगण्यात आले.

सध्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर वीजेची वाढती मागणी लक्षात घेता वीज बचत करणे गरजेचे असून, अनावश्यक वीज वापर टाळण्याचे आवाहन करण्यात आले आहे. यासंदर्भात महावितरण अधिकाऱ्यांनाही निवेदनाची प्रत पाठविण्यात आल्याची माहिती ग्राहक पंचायतचे अध्यक्ष प्रा. प्रकाश देशमुख यांनी दिली.

# मांग, मांतग समाजातील बांधवांसाठी कार्यशाळेचे आयोजन

प्रतिनिधी २५ एप्रिल

**यवतमाळ :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ मर्या. यवतमाळ मार्फत मांतग समाज व तत्सम १२ पोट जातीतील वंचित असलेल्या नागरिकांसाठी यवतमाळमध्ये 30 एप्रिल रोजी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

मांग व मांतग समाजातील लोकांना विविध योजनांची माहिती देणे तसेच समाजातील लोकांचे जीवनमान उंचावावे या कार्यशाळेचे मुख्य उद्देश आहे. ही कार्यशाळा सामाजिक न्याय भवन, पळसवाडी कॅम्प, दारव्हा रोड, यवतमाळ येथे दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

# यवतमाळमध्ये ‘हिस्टोरिक रन मॅरेथॉन’

प्रतिनिधी २५ एप्रिल

**यवतमाळ :** अहिल्यानगर येथे होणाऱ्या “हिस्टोरिक रन मॅरेथॉन – सीझन ५” च्या पार्श्वभूमीवर यवतमाळ शहरात आयोजित प्रोमो रनला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अहिल्या नगर सायकलिंग क्लबतर्फे आयोजित या रनमध्ये ५ व १० किमी अशा दोन गटांमध्ये शेकडो नागरिकांनी सहभाग नोंदविला. नेहरू स्टेडियम, गोधनी रोड येथून पहाटे ६ वाजता रनला हिरवा झेंडा दाखवून सुरुवात करण्यात आली.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, तहसीलदार योगेश देशमुख, जिल्हा क्रीडा अधिकारी शिल्पा चाबुकस्वार, जिल्हा वाहतूक शाखेचे प्रमुख ज्ञानोबा देवकते, यवतमाळ हेल्थ मॅरेथॉन आयोजन समितीचे अध्यक्ष डॉ.



परेश गंडेचा, सचिव डॉ. शरद राखुंडे, तसेच डॉ. प्रशांत तामगाडगे, डॉ. आकाश कुडमेथे, डॉ. दिलीप चव्हाण व डॉ. ज्ञानेश्वर पुनसे आदी उपस्थित होते.

अहिल्या नगर सायकलिंग क्लबचे संस्थापक गौरव फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रभर अशा प्रोमो रनचे आयोजन करण्यात येत आहे. यवतमाळमधील आयोजनाला यवतमाळ हेल्थ मॅरेथॉन आयोजन समितीचे सहकार्य लाभले.

स्पर्धकांसाठी संपूर्ण मार्गावर वैद्यकीय सेवा व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. सहभागी धावपटूंना टी-शर्ट, गुडी बॅग व ई-सर्टिफिकेट देण्यात आले.

या उपक्रमामुळे शहरात ‘हिस्टोरिक रन मॅरेथॉन’बाबत उत्साह निर्माण झाला असून, आगामी मुख्य स्पर्धेसाठी सकारात्मक वातावरण तयार झाल्याचे दिसून येत आहे.

# उमरखेडमध्ये जलसंवर्धनाची लोकचळवळ; गोदावरी ते नर्मदा जलयात्रेला प्रतिसाद

## आमदार वानखेडे यांच्या हस्ते पैनगंगा जलकलश पूजन

प्रतिनिधी २५ एप्रिल

**उमरखेड :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या ‘गोदावरी ते नर्मदा जलयात्रा’ उपक्रमाला उमरखेडमध्ये प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने पैनगंगा नदीच्या जलकलशाचे पूजन उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसनराव वानखेडे यांच्या हस्ते करण्यात आले.

दि. २० एप्रिल रोजी उमरखेड येथे झालेल्या या कार्यक्रमास कार्यकारी अभियंता अ. बा. जगताप,




उपविभागीय अभियंता एस. ए. खोकले, खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष सुदर्शन रावते पाटील, स्थानिक पदाधिकारी, पत्रकार आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमात जलसंवर्धन, पाण्याचा काटकसरीने वापर तसेच जलप्रदूषण रोखण्याचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून पाणी व्यवस्थापनाबाबत लोकचळवळ उभी राहावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

आमदार किसनराव वानखेडे यांनी यावेळी बोलताना, ‘गोदावरी ते नर्मदा जलयात्रा’ ही केवळ धार्मिक किंवा प्रतीकात्मक चळवळ नसून पाणी नियोजन व जनजागृतीसाठी महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे सांगितले. नागरिकांनी पाण्याचा जबाबदारीने वापर करावा आणि जलसंवर्धनासाठी एकत्र येऊन काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

या उपक्रमामुळे परिसरात जलसंवर्धनाविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

# वादग्रस्त पेट्रोल पंपाच्या लीजवाढीवरुन संताप; जनसुनावणीची मागणी

## सर्वपक्षीय नेत्यांचा एसडीओ कार्यालयावर मोर्चा

प्रतिनिधी २५ एप्रिल

**उमरखेड :** छत्रपती शिवाजी महाराज स्मारकालगत असलेल्या वादग्रस्त पेट्रोल पंपाच्या लीजला पाच वर्षांची मुदतवाढ देण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्णयावरून शहरात संताप व्यक्त होत आहे. या निर्णयाचा पुनर्विचार करून जनसुनावणी घ्यावी व संबंधित पेट्रोल पंप हटवावा, या मागणीसाठी विविध पक्षांच्या नेतेमंडळी व कार्यकर्त्यांनी उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयावर धडक देत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठविले.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पेट्रोल पंप छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळा स्मारकालगत असून, गेल्या अनेक वर्षांपासून हा विषय वादात आहे. असे असताना



यवतमाळ जिल्हाधिकाऱ्यांनी प्रकरण क्र. एलएनडी 02/2022-23 अंतर्गत उमरखेड येथील वार्ड क्र. १ मधील जागेची लीज आणखी पाच वर्षांसाठी वाढविण्याचा आदेश दिला आहे. या निर्णयामुळे स्मारकाच्या सौंदर्यीकरणास अडथळा निर्माण होत असल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची जनसुनावणी घेऊन जागेचे पुनर्निरीक्षण करावे व पेट्रोल पंप अन्यत्र स्थलांतरित करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनात शिवसेना (शिंदे गट) जिल्हा सहसंपर्क प्रमुख चितांगराव कदम, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष दत्तराव शिंदे, यवतमाळ जिल्हा काँग्रेस सरचिटणीस गोपाल अग्रवाल, जनशक्ती पॅनलचे ॲड. संतोष जैन, शिवसेना (शिंदे) ॲड. संजीव जाधव, अनिल नरवाडे, रमेश चव्हाण, बाळासाहेब नाईक, खविसचे अध्यक्ष सुदर्शन पाटील रावते, शिवसेना (शिंदे) तालुका अध्यक्ष प्रविण मिराशे पाटील, भाजपचे तालुका अध्यक्ष विठ्ठल वानखेडे, माजी पंचायत समिती सभापती प्रज्ञानंद खडसे, नगरसेवक साजीद जागीरदार, गणेश खंदारे, रसुल पटेल, गजानन रासकर, काँग्रेसचे कल्याणराव राणे, ॲड. शिवाजी वानखेडे, विनायक कदम, बसवेश्वर क्षीरसागर, भाजपचे गजानन पाटील वाघमारे, कपील चव्हाण, सपना चौधरी, संतोष जाधव, तानाजी चंद्रवंशी, बालाजी वानखेडे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नायब तहसीलदार सुभाष पाईकराव यांच्यामार्फत हे निवेदन मुख्यमंत्र्यांकडे पाठविण्यात आले.

दरम्यान, या निर्णयाच्या निषेधार्थ २७ एप्रिल रोजी सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चात नागरिक, व्यापारी व विविध संघटनांनी सहभागी व्हावे, असे आवाहन चितांगराव कदम यांनी केले आहे.

# २१ वर्षांच्या सेवेनंतर रमेश बालेवार यांना सन्मानपूर्वक निरोप

प्रतिनिधी २५ एप्रिल

**दिग्रस :** श्रीराम अर्बन पतसंस्थेचे शिपाई रमेश बालेवार यांनी २१ वर्षांची प्रामाणिक सेवा पूर्ण करून सेवानिवृत्ती स्वीकारली. यानिमित्त पतसंस्थेत आयोजित निरोप समारंभात भावनिक वातावरण निर्माण झाले.

समारंभादरम्यान सहकाऱ्यांमधील जिव्हाळा, आठवणी आणि बालेवार यांची कार्यनिष्ठा यामुळे अनेकांच्या भावना अनावर झाल्या. संस्थेचे व्यवस्थापक निलेश अस्वार यांनी शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन बालेवार यांचा सत्कार करत त्यांना सन्मानपूर्वक निरोप दिला.



आपल्या मनोगतात त्यांनी बालेवार यांच्या प्रामाणिक सेवाभावाचे व कर्तव्यनिष्ठेचे कौतुक केले.

या प्रसंगी अमोल पोहरकर, रमेश ठाकरे, संदीप रत्नपारखी, दिलीप सोनोने, अरविंद वाकोडे, प्रवीण बाकडे, सुशील रत्नपारखी, संजय जाधव, निलेश दातीर, नरेश जाधव यांच्यासह पतसंस्थेचे कर्मचारी उपस्थित होते. समारोपात उपस्थितांनी रमेश बालेवार यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या सेवेला गौरवपूर्ण सलाम केला.

सिटी न्यूज अमरावती

शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# सायन्स लॅब उभारणी साठी नगरसेवक रोशन कट्यारमल यांचा पुढाकार

**अमरावती :** दर्यापूर शहरातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सायन्स लॅब उभारणीसाठी आवशक आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना प्रायोगिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देणे, शहरी भागातील नगर परिषदेच्या शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व इतर विद्यार्थ्यांना सुद्धा शैक्षणिक दरी विज्ञान विषयाबद्दल आवड व समज वाढेल.

विद्यार्थ्यांना भविष्यातील स्पर्धा परीक्षा व करिअरसाठी सक्षम बनवेल. यासाठी नगरसेवक रोशन कट्यारमल यांनी पुढाकार घेतला आहे. यासंदर्भात त्यांनी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनाही निवेदन दिले होते.

# धारणीतील रेती तस्करीवर 'मध्यरात्री सर्जिकल स्ट्राईक

प्रतिनिधी २५ एप्रिल



**धारणी:** सोनाबर्डी येथील तापी नदीच्या रेती घाटावर सुरू असलेल्या अवैध उत्खननावर महसूल प्रशासनाने अक्षरशः 'मध्यरात्री सर्जिकल स्ट्राईक' करत तस्करांचे जाळे उधळून लावले. उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी कोणताही गाजावाजा न करता दुचाकीवरून थेट घाट गाठत छापा टाकला आणि पोकलँड मशीनसह तीन वाहने जप्त केली. या धाडसी कारवाईमुळे रेती माफियांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.गेल्या काही दिवसांपासून सोनाबर्डी घाटावर मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी वाढत होत्या. मात्र, या कारवाईची कुणालाही चाहूल लागू न देता शुक्ला यांनी अत्यंत गुप्तपणे योजना आखली. गुरुवारी मध्यरात्री सुमारे १२ वाजता दोन

कर्मचाऱ्यांसह दुचाकीवरून त्यांनी थेट घाटावर एंट्री घेतली आणि सुरू असलेला अवैध उपसा रंगेहात पकडला.अचानक अधिकाऱ्यांची उपस्थिती पाहताच मजूर आणि यंत्र चालकांनी घटनास्थळावरून पळ काढला. काहींनी अंधाराचा फायदा घेत नदीकाठ सोडला, तर काहींनी वाहनांसह पसार होण्याचा प्रयत्न केला. मात्र, अधिकाऱ्यांनी चपळाईने पाठलाग करत एक टिप्पर आणि कॅम्पर वाहन ताब्यात घेतले. याशिवाय, जवळील शेतात लपवून ठेवलेले पोकलँड मशीनही शोधून काढत जप्त करण्यात आले.

या कारवाईचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात आले असून,

परवानगीपेक्षा अधिक उत्खनन झाल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधित घाटमालकांवर कठोर कारवाईसह घाट बंद करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.या धाडीत नायब तहसीलदार राजेश माळी, गजानन कुंबरे, मंडळ अधिकारी अनिल उमाळे, रोकडे, राहुल घोगरे, लिपिक नितीन गिरनाळे तसेच स्थानिक पोलिसांचा सहभाग होता. या धडक कारवाईनंतर परिसरातील अवैध वाळू तस्करांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, अनेकांनी घाट परिसरातून काढता पाय घेतल्याची चर्चा आहे.

तालुक्यात कुठेही अवैध रेती उत्खनन किंवा तस्करी आढळल्यास तत्काळ कठोर कारवाई केली जाईल असा इशारा उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी दिला.

# अमरावतीत श्री. बागेश्वर धाम यांची श्रीराम कथा

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अमरावती :** श्री. बागेश्वर धाम शासनातर्फे आयोजित श्री. राम कथा २६ ते ३० एप्रिल या कालावधीत सायंकाळी ४ वाजल्यापासून हरीच्या इच्छेपर्यंत सुरू राहील. या पवित्र सोहळ्याबद्दल भक्तगण विशेषतः उत्साही आहेत. आयोजकांनी समाजसेवक चंद्रकुमार जाजोदिया, उर्फ लप्पीभैया यांना निमंत्रित केले आहे.

आयोजकांनी शहरवासीयांना मोठ्या संख्येने सहभागी होऊन या धार्मिक सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. ही राम कथा श्रद्धा, भक्ती आणि धर्माचा प्रसार करण्याचे एक महत्त्वाचे माध्यम मानली जाते, आणि ही कथा दररोज सादर केली जाते.

बागेश्वर धाम सेवा समितीच्या वतीने निमंत्रण देण्यासाठी अमिता सिंह, रोशनी




सिंह, अनुदिता दास वाजपेयी, वैशाली धोणे, दीपा पाचौरी (कामठी विधानसभा, नागपूर), रेखा शेंद्रा आणि सतीश शेंद्रा उपस्थित होते. सर्वांनी लप्पीभैय्याजींची भेट घेऊन त्यांना आदराने कार्यक्रमासाठी आमंत्रित केले.

समिती सदस्यांनी सांगितले की, या कार्यक्रमामुळे समाजात धार्मिक जागृती वाढण्यास आणि सकारात्मक ऊर्जा पसरण्यास मदत होईल. त्यांनी सर्व भक्तांना त्यांच्या कुटुंबासह उपस्थित राहून पवित्र कथेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

भक्तांनी गावाबाहेरून येणाऱ्यांसाठी चहा, नाश्ता आणि जेवणाची व्यवस्था केली आहे.

# भातकुली येथील नवीन तहसील इमारतीच्या बांधकामाची आ. रवी राणा यांनी केली पाहणी

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अमरावती:** आमदार रवी राणा यांनी भातकुली येथे उभारण्यात येणाऱ्या नवीन तहसील इमारतीच्या बांधकामाची महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसह पाहणी केली. या वेळी त्यांनी सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत, बांधकामाची गुणवत्ता, गती आणि नियोजन याबाबत अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

भातकुली तालुक्यातील नागरिकांची शासकीय कामे सुलभ व जलद व्हावीत या उद्देशाने तहसील कार्यालय भातकुलीतच असावे, असा ठराव पारित करून तेथे तहसील कार्यालय सुरू करण्यात आले आहे. या



निर्णयामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, विविध कामांसाठी दूरवर जाण्याची गरज आता कमी झाली आहे.

तहसील कार्यालयाची इमारत आधुनिक व सर्व सोयींनी सुसज्ज असावी यासाठी आ. रवि राणा यांनी शासनाकडून तब्बल ८० कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला आहे. या निधीतून प्रशस्त, अत्याधुनिक सुविधा असलेली, नागरिकाभिमुख सेवा देणारी नवीन इमारत उभारण्यात येणार आहे.

आ. रवी राणा यांनी सांगितले की, बडनेरा मतदारसंघाचा सर्वांगीण विकास हा आमचा ध्यास असून, शहरासोबतच ग्रामीण भागालाही तितक्याच प्राधान्याने सुविधा उपलब्ध करून देत आहोत. भातकुली येथील नवीन तहसील इमारत ही त्या दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.

यावेळी सुनिल राणा, उपविभागीय अधिकारी दराळे तहसिलदार अक्षय मांडवे, न.प.भातकुली मुख्याधिकारी बोरेकर मॅडम, मंडल अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, उपअभियंता यासह मंगेश इंगोले पाटील, प्रकाश खर्चान, राजु चुनकीकर, हर्षद वाचासुंदर, समाधान वानखडे, गौतम खंडारे, प्रतीक कांडलकर, राजु तेलमोरे, विनोद अंबर्ते, मुधकर रोडगे, शंकर डोंगरे, सादिकभाई, पद्माकर गुल्हाने, अनिल तिडके, पुरुषोत्तम खर्चान, मोहीत देशमुख, मिलींद अवघडे, अहमद पठान, सुनिल भोपसे, विलासभाऊ, रवि गावंडे, सतीश मंत्री आदि उपस्थित होते.

# मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अमरावती:** बुलडाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक क्षेत्रात यशाचा नवा मानदंड प्रस्थापित केला आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी भूषण काळे याने 'द इन्स्टिट्□ट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' द्वारे आयोजित चार्टर्ड अकाउंटन्सी (सीए), तर खुशी अग्रवाल हिने इंटरमिजिएट परीक्षेत घवघवीत यश संपादन करून व्यावसायिकतेच्या दिशेने यशस्वी पाऊल टाकले आहे. तिची निवड जागतिक स्तरावरील 'पीडब्ल्यूसी' मध्ये झाली. यामुळे महाविद्यालयाच्या यशात एक मानाचा तुरा खोवला गेला. खुशी



अग्रवालची झालेली निवड म्हणजे जगातील प्रतिष्ठित 'बिग फोर' ऑडिट आणि कन्सल्टिंग संस्थांपैकी एक असलेल्या पीडब्ल्यूसी' या मुंबईतील जागतिक व्यावसायिक सेवा फर्ममध्ये झाली आहे. भूषण काळे याने सीए सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण करण्यासोबतच खुशी अग्रवालने इतक्या मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपनीत स्थान मिळवणे या दोन्ही विद्यार्थ्यांच्या कष्टाची आणि महाविद्यालयाच्या मार्गदर्शनाची पावती आहे.

भूषण आणि खुशी यांनी सातत्यपूर्ण अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. बुलडाणा सारख्या छोट्या शहरांतील विद्यार्थी देखील जिद्द असेल तर यश संपादन करू शकतात हे देखील अधोरेखित झाले आहे. या दोन्ही विद्यार्थ्यांच्या उत्तुंग यशाबद्दल मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ. अण्णासाहेब म्हळसणे यांनी त्यांचे कौतुक व अभिनंदन केले. यावेळी महाविद्यालयातील डॉ. महेश व्यवहारे, प्रा. दिपक नन्हई, प्रा. सुचिता माळोदे, डॉ. दिपक देशमुख, प्रा. अक्षय नरवाडे, प्रा. प्रमोद पंडित, प्रा. बलवान विणकर, डॉ. मुरलीधर जाधव, प्रा. सुनिता गायकी तसेच प्राध्यापकवृंद उपस्थित होते. भूषण आणि खुशी यांच्या या कामगिरीमुळे संपूर्ण परिसरातून आणि शैक्षणिक वर्तुळातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# मोफत रोगनिदान शिबिर

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अमरावती :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या १०० व्या वर्धापन दिनानिमित्त, जनतेमध्ये सेवा, त्याग, समर्पण आणि देशभक्तीची भावना रुजवण्यासाठी एका भव्य मोफत निदान आणि वैद्यकीय उपचार शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, भारतीय जनता युवा मोर्चा आणि भारतीय जनता पार्टी यांसारख्या विविध सामाजिक संघटनांच्या सहकार्याने या शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे.

चंद्रकुमार जाजोदिया (लप्पीभैया) आणि त्यांच्या टीमच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले असून, शहरातील अनुभवी आणि तज्ञ डॉक्टर आपली सेवा विनामूल्य देत आहे.

सर्वसाधारण निदान, नेत्र तपासणी आणि उपचार


अस्थिविकार सल्ला, दंत उपचार रक्तशर्करा, रक्तदाब आणि हिमोग्लोबिनची मोफत तपासणी केली जाईल. या शिबिरात सर्वसाधारण वैद्य, नेत्ररोगतज्ञ, अस्थिरोगतज्ञ आणि दंततज्ञ यांच्यासह विविध क्षेत्रांतील तज्ञ डॉक्टर सेवा देतील, ज्यामुळे जनतेला एकाच छताखाली सर्वसमावेशक आरोग्य लाभ मिळेल.श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्था, जेवड नगर, गल्ली क्र. ०९, अमरावती येथे वेळ: सकाळी ९:३० ते दुपारी १२:०० दिनांक: २६ एप्रिल २०२६, रविवार सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या प्रकल्प अध्यक्षा डॉ. साक्षी जिंतुरकर असून, अनेक समाजसेवकांनी आयोजनासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. सर्व नागरिकांना विनंती आहे की, त्यांनी या मोफत आरोग्य शिबिराचा पुरेपूर लाभ घ्यावा आणि आपल्या कुटुंबियांना, मित्रांना व आजूबाजूच्या लोकांनाही याबद्दल कळवावे. तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी आणि सल्ला मिळवण्याची ही एक उत्तम संधी आहे.

# एनडीपीएस मधील दोन फरार आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अमरावती :** पोलीस स्टेशन नागपुरी गेट पोलिस स्टेशन अंतर्गत एन.डी.पी.एस अ‍ॅक्ट मधील दोन फरार आरोपींना ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई अमरावती शहर गुन्हे शाखेने केली.

०८/०३/२०२६ रोजी गुन्हे शाखेचे पथक यांनी सायंकाळी ०६.०० वा. च्या सुमारास गुप्त माहीतीच्या आधोरे आरोपी न अब्दुल फहीम अब्दुल रहीम उर्फ फहिम एफ. बी वय २५ वर्ष, रा. आझाद नगर, अमरावती, शेख अयान शेख रमजान वय २० वर्ष, रा व्दारका नगर, अम यांना ताब्यात घेवुन त्याच्या ताब्यातुन २ किलो. ८० ग्रॅम (एम.डी.) मॅफेडॉन पाउडर कि.अ. ३,११,८५,०००/- व दुचारी वाहन असा एकूण कि.अ. ३,१२,६०,०००/-रू चा मुद्देमाल जप्त करून नागपुरी गेट पोलीस स्टेशन अप.क. ११२/२०२६ कलम ८ (क) २१(क) २८,२९





एन.डी.पी.एस अ?क्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता. सदर गुन्हाची व्याप्ती ही मोठ्या प्रमाणात असल्याने सदर गुन्हाचा तपास वरिष्ठ अधिकारी यांचे आदेशान्वये गुन्हे शाखा करत असून नमुद आरोपी यांनी सदरचा (एम.डी.) मॅफेडॉन अंमली पदार्थ हा अमरावती मधील आरोपी नामे शेख नाझीम शेख रहीम वय ३४ वर्ष रा. गवळीपुरा, अमरावती तसेच शेख रहीम उर्फ होन्गां शेख आमद, वय ६० वर्ष रा. गवळीपुरा, अमरावती यांना इतर ०७ आरोपी यांच्या करीता मुंबई येथुन आणल्याचे सांगीतले होते.

२३/०४/२०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली कि सदर गुन्हयातील फरार आरोपी अब्बास अहमद बशीर अहमद कुरेशी वय २८ वर्ष रा. चांदुर बाजार, अमरावती सकीब जावेद मोहम्मद आसीफ कुरेशी, वय २५ वर्ष रा. गवळीपुरा अमरावती हे अपना बेकरीच्या मागे, सुफियान नगर अमरावती येथे त्यांचे नातेवाइक यांच्या घरी रात्री उशीरा येणार आहेत अशा खात्रीलायक माहीती वरून दिनांक २४/०३/२०२६ रोजी गुन्हे शाखेच्या पथकाने अतिशय शिताफीने नमुद दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेऊन नमुद आरोपीना सदर गुन्हयात अटक करण्यात आली.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नावे अब्बास अहमद बशीर अहमद कुरेशी, वय २८ वर्ष, रा. चांदुर बाजार, अमरावती सकीब जावेद मोहम्मद आसीफ कुरेशी, वय २५ वर्ष, रा. गवळीपुरा, अमरावती असे आहे. नमुद दोन्ही आरोपीविरुदध अमरावती शहर येथे अंमली पदार्थ विरोधी विविध गुन्हे दाखल असुन आज दिनांक २४/०४/२०२६ रोजी दोन्ही आरोपीना मा. न्यायालयात हजर करण्यात आले असता नमुद दोन्ही आरोपी यांना दिनांक २७/०४/२०२६ रोजी पर्यंत पि.सी.आर देण्यात आला आहे. सदर गुन्हयात आजपावेतो एकुण १० आरोपी यांना अटक करण्यात आली आहे तसेच पुढिल तपास पोनि संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखा करीत आहे.


# राज्यस्तरीय राजीव गांधी कृषिरत्न पुरस्कार सोहळा

प्रतिनिधी २५ एप्रिल

## ♦ पत्र परिषदेत प्रकाश साबळे यांची माहिती

**अमरावती:** राज्यस्तरीय राजीव गांधी कृषि रत्न पुरस्कार वितरण सोहळा सन २०२५ - २०२६ हा २१ में गुरुवार २०२६ (दि. २१ में २०२६ ते २८ में २०२६ पर्यंत शेतकरी सन्मान सप्ताह) (स्थळ - पुरस्कार प्राप्त शेतक-यांच्या बांधावर) २१ में हा दिवस भारताचे माजी पंतप्रधान विज्ञान क्रांतीचे जनक स्व. राजीव गांधी यांचा स्मृतिदिन स्व राजीव गांधी यांच्या स्मृतिदिन राज्यातील प्रयोगशील व प्रगतशिल शेतक-यांचा सन्मान राज्य स्तरीय राजीव गांधी कृषी रत्न पुरस्कार देवून साजरा करण्यात येणार असल्याची माहिती पत्रपरिषदेत माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांनी दिली.

सन २००७ पासून सातत्याने हा उपक्रम सुरू शेतकरी सन्मानाचे सलग २० वे वर्ष. आज पर्यंत ३९४ प्रगतशील शेतकरी, कृषि कंपनी, शेतमजूर, कृषि वैज्ञानिक, कृषि उद्योजक, कृषि पत्रकार, महिला



शेतकरी यांना सदर पुरस्कार प्रदान राज्यस्तरीय राजीव गांधी पुरस्कार प्राप्त १३२ शेतक-यांना आज पर्यंत राज्य शासनाचे कृषि पुरस्कार प्राधान्याने जाहिर

सदर पुरस्कार सोहळा दि. २१ में २०२६ ते २८ में २०२६ पर्यंत शेतकरी सन्मान सप्ताह म्हणून साजरा करणार आहे.

यावर्षीच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्याची सुरवात दि. २१ में २०२६ रोजी सकाळी ९.०० वा. तिर्थक्षेत्र दोनद (गणपती मंदिर) येथे बैलजोडी पुजनाने होणार आहे. समारोप २८ मे रोजी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पाल्यांचे संगोपन करणारी सेवाभावी संस्था यांना पुरस्कार देऊन होणार आहे.

सदर सोहळ्याचे आयोजन राजीव गांधी कृषि विज्ञान प्रतिष्ठान, अमरावती तर्फे होत आहे.

राज्यभरातील विविध प्रांतामधून २१ शेतकरी निवडल्या जाणार आहे. यामध्ये प्रयोगशील शेतकरी, महिला शेतकरी, कृषि वैज्ञानिक, उत्कृष्ट तिफनकरी, कृषि उद्योजक, फार्मर प्रोड्युसर कंपनी तसेच (कृषी पत्रकारिता (प्रिंट/इलेक्ट्रॉनिक) मधून एक) अशा कृषी संबंधीत २१ प्रवर्गातून २१ शेतक-यांची निवड होणार आहे.यावर्षी विशेष कृषी पुरस्कार देण्यात येणार आहे.

राज्य स्तरीय पुरस्कार देत असतांना महाराष्ट्रातील कृषी विकास व ग्राम विकास संबंधित या थोर संत, महात्मा, समाजसुधारक, कृषी तज्ञ यांनी काम केले आहे अशा जेष्ठ-श्रेष्ठ महान व्यक्तीच्या नावे पुरस्कार प्राप्त शेतक-यांना पुरस्कार दिले जाणार आहे.

राजीव गांधी कृषि प्रतिष्ठान ने शेतक-यांची निवड करण्यासाठी राज्य शासनाच्या जिजामाता कृषि भूषण पुरस्कार प्राप्त महिला शेतकरी व ग्रामगिताचार्या सी. पोर्णिमाताई सवाई यांच्या अध्यक्षतेखाली १२ कृषी तज्ञांची: शेतकरी निवड समिती नेमली आहे. पुरस्कार प्राप्त शेतक-यांना सन्मान चिन्ह, राजीव गांधी यांची प्रतिमा, मानधन, प्रमाणपत्र, सन्मानाच्या वस्तू प्रदान करण्यात येणार आहे.राज्यस्तरीय आयोजनामध्ये राज्यातील प्रगतशील शेतक-यांचे पुरस्कारासाठी जवळपास ३०० प्रस्ताव येणे अपेक्षित आहे.

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय व स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्रातर्फे विदर्भस्तरीय स्विमिंग स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अमरावती :** क्रीडा क्षेत्रातील जलतरणपटूंना प्रोत्साहन देण्यासाठी स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृती जलतरण केंद्र व श्री. शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने श्री. शिवाजी शिक्षण संस्था चे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली विदर्भस्तरीय स्विमिंग स्पर्धेचे आयोजन दिनांक २६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्येल् विविध वयोगटातील खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे.

स्पर्धेमध्ये गट क्र. १ : अंडर १० (२०१६ ते २०१८) गट क्र. २ : अंडर १२ (२०१४ ते २०१५)

गट क्र. ३ : अंडर १५ (२०११ ते २०१३) या वयोगटांचा समावेश करण्यात




आला आहे सदर स्पर्धेसाठी एकूण रु. १,००,०००/- इतक्या रोख बक्षिसांसह पदके व प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. सहभागी खेळाडूंना जास्तीत जास्त ३ स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यानुसार इच्छुक खेळाडूंनी १० एप्रिल ते २४ एप्रिल २०२६ या कालावधीत स्पर्धकांनी आपली नोंदणी केली त्यानुसार १२० स्विमिंग स्पर्धक सदर स्पर्धेमध्ये नोंदणी झालेली आहे अशी माहिती आयोजकांनी दिली करिता सदर स्पर्धेला स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता २५ एप्रिल २०२६ या रोजी सुद्धा इच्छुक खेळाडूंना आपली नोंदणी करता येईल असे आयोजकांकडून कळवले आहे

या स्पर्धेमुळे विदर्भातील जलतरणपटूंना आपली प्रतिभा सिद्ध करण्याची संधी मिळणार असून स्पर्धेचे आयोजक श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष व स्व. अनंत पंजाबराव देशमुख स्मृति जलतरण केंद्राचे अध्यक्ष दिलीपबाबू इंगोले व श्री. शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य व जलतरण केंद्राचे सचिव डॉ. सुभाष गावंडे यांनी मोठ्या संख्येने खेळाडूंनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रा. सौरभ काळमेघ मो.९५१८९४५८८४ व श्री राजेश जोंधळे मो. ९३०७३८३४९१ यांच्याशी संपर्क साधून आपली नोंदणी करावी.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि २५ एप्रिल २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

* जिल्हाधिकारी साहेब, सर्कस सोडून बाहेर या हो.
*वाघासारखी; कुळमेथेवर आता तरी कार्यवाही करा हो.




# शेतकऱ्याला आत्महत्येचा सल्ला, समाधान शिबिर सोडले वाऱ्यावर !

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

रिसोड तहसील अंतर्गत केनवड येथे आयोजित करण्यात आलेल्या समाधान शिबिराबाबत नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे. शिबिरात मोठ्या संख्येने शेतकरी व नागरिक उपस्थित होते; मात्र काही ठिकाणी नायब तहसीलदार कुळमेथे तेथून 'काम आहे' असे सांगून हार-फुलगुच्छ स्वीकारल्यानंतर निघून गेल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली.



नागरिकांच्या समस्या सोडवून त्यांना समाधान देणे अपेक्षित असताना, त्याऐवजी संबंधित अधिकारी मेहकर–मालेगाव या राष्ट्रीय महामार्गावर वाळूच्या टिप्पर अडविण्यात व्यस्त असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे नागरिकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याची भावना व्यक्त होत आहे.काही महिन्यांपूर्वी एका शेतकऱ्याला आत्महत्या करण्याचा सल्ला दिल्याचा आरोप संबंधित अधिकाऱ्यांवर झाला होता. त्या प्रकरणात कोणतीही कारवाई झालेली नाही. आता समाधान शिबिर सोडून महामार्गावर कारवाईत व्यस्त राहिल्यामुळे नागरिकांमध्ये संताप वाढला आहे. त्यामुळे 'जिल्हाधिकारी साहेब, तुम्हीच मैदानात या आणि संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करा,'असा आर्त टाहो शेतकरी व नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. शिबिरात कर्मचारी अपुरे असल्याने आणि कामाचा वेग मंद असल्याने अनेकांना प्रतीक्षा करावी लागली. काही कामे प्रलंबित राहिल्याची तक्रार करण्यात आली.कार्यक्रमादरम्यान नायब तहसीलदार कुळमेथे यांनी शिबिराला भेट दिल्यानंतर तेथून निघून गेल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली. शिबिर सुरू असताना जबाबदार अधिकारी उपलब्ध नसल्याने अनेक तक्रारी तत्काळ निकाली निघू शकल्या नाहीत. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, त्यानंतर संबंधित अधिकारी मेहकर–मालेगाव महामार्गावर वाळू वाहतुकीवरील कारवाईत व्यस्त होते. त्यामुळे नागरिकांच्या समस्या प्रलंबित असताना इतर कारवायांना प्राधान्य दिले जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांवर एका शेतकऱ्याला आत्महत्येबाबत सल्ला दिल्याचा आरोप चर्चेत आला होता. त्या पार्श्वभूमीवर सध्याच्या घटनेमुळे नागरिकांमध्ये संताप वाढला आहे.'तक्रारी होतात, प्रकार घडतात पण कारवाई का होत नाही?'असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रकरणात लक्ष घालून सखोल चौकशी करावी व नायब तहसीलदार कुळमेथे यांच्यावर तात्काळ कार्यवाही करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## थोडक्यात

### रिसोड तालुक्यातील नागरिकांसाठी महत्वाची सूचना

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड तालुक्यातील सर्व नागरिकांनी शासनाच्या घरकुल योजनेबाबत काही अडचणी, तक्रारी किंवा अन्याय होत असल्यास संबंधित बाबी गांभीर्याने मांडणे अत्यंत आवश्यक आहे. घरकुल संदर्भात कोणतीही तक्रार असल्यास प्रथम पंचायत समिती कार्यालय, रिसोड येथे लेखी स्वरूपात तक्रार दाखल करावी. तथापि, संबंधित तक्रारीवर कोणतीही कारवाई होत नसल्यास अथवा समाधान कारक मार्ग निघत नसल्यास, पुढील पाऊल उचलावे. आपल्याकडे असलेले सर्व पुरावे (दस्तावेज, फोटो, इतर माहिती) यासह दैनिक सिटीन्यूज सुपरफास्ट कार्यालयाशी संपर्क साधावा. आपल्या तक्रारीला न्याय मिळवून देण्यासाठी तसेच जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी दैनिक सिटीन्यूज सुपरफास्ट पुढाकार घेणार आहे.

# रिसोड येथे जिजाऊ हॉस्पीटलचे आज स्थानांतरण व शुभारंभ !

## विविध मान्यवरांची उपस्थिती ; सुसज्ज प्रसुती व महिला रुग्णालय

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

शहरात मागील दहा वर्षांपासून अखंड रुग्णसेवा करून नावारुपास आलेल्या येथील जिजाऊ हॉस्पीटल प्रसुती व स्त्री रुग्णालयाचे स्थलांतरण व भव्य शुभारंभ २५ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता रिसोड शहरातील बसस्थानक समोर डॉ. साबू यांच्या हॉस्पीटल जवळ विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होत असून सदर कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ.अमोल रतन नरवाडे व डॉ.करुणा अमोल नरवाडे यांच्यावतीने करण्यात आले आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खा.अनंतराव देशमुख राहणार







असून केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याहस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी खासदार रामराव वडकुते, खासदार अनुप धोत्रे, आमदार भावनाताई गवळी, आमदार अमित झनक, आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार शाम खोडे, आमदार किरणराव सरनाईक, माजी आमदार विजयराव जाधव, माजी आमदार संजय रायमुलकर, नगराध्यक्ष भगवानराव क्षीरसागर, वाशीम नगर पालिकेचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, जिल्हा शल्यचिकित्सक अनिल कावरखे, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे, उपजिल्हाधिकारी दिलीप बाजड, तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर, दि.अकोला मध्यवर्ती जिल्हा बँकेचे डॉ. जयराज कोरपे, माजी उपाध्यक्ष वामनराव देशमुख, मुख्याधिकारी सतीष सेवदा, ठाणेदार रामेश्वर चव्हाण, जिल्हा पत्रकार संघाचे माधवराव अंभोरे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती राहणार आहेत. तरी, सदर कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ.अमोल रतन नरवाडे व डॉ.करुणा अमोल नरवाडे यांच्यावतीने करण्यात आले आहे. उपलब्ध सुविधा सुसज्य अंतररुग्ण विभाग, वेदनारहित प्रसुती, प्रसुतीपुर्व व नंतर तपासणी, वंधत्व निदान व उपचार, अत्याधुनिक प्रसुती गृह, दुर्बिनद्वारै लेप्रोस्कोपी शस्त्रक्रियेची सुविधा, नवजात शिशूसाठी सर्वो कंट्रोल वार्मर, एनएसटी सुविधा, मासिक पाळीच्या तक्रारीवर मार्गदर्शन, गर्भपिशवी, कॅन्सर निदान व उपचार आदी सुविधा उपलब्ध असून सदर सेवेचा रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ.नरवाडे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# कारंजा शहरात देशी विदेशी दारूच्या दुकानाचे नियम धाब्यावर !

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

### शहरात ज्यादा दराने दारू विक्री



कारंजा शहरांमध्ये नियमाचे उल्लंघन करू न व कायद्याचे बंधन न पाळता वाईन शॉप, बियर बार,बिअर शॉपी व देशी दारूचे दुकानातून खुलेआम दुकानांमधून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर अवैध मार्गाने दारू विक्री जात आहे.जास्त भावाने दारू विक्री केल्या जातात,बंदच्या दिवशी (ड्राय-डे) सुद्धा मागच्या रस्त्याने दारू विकल्या जात आहे.

दारूचे दुकान सकाळी ६:०० वाजता उघडतात व रात्री ११:०० वाजेपर्यंत चालवतात यावर कोणतीही कारवाई न करता दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क मंगरूळपीर अधिकारी हे फक्त हप्ते वसुली करण्याकरीताच कारंजा शहरात येतात.सविस्तर माहिती अशी की कारंजा शहरांमध्ये (१)सीएल-३ दुकानाची संख्या देशी दारू ५ असून या दुकानाची उघडण्याची वेळ सकाळी ८:०० वाजता असून बंद करण्याची वेळ रात्री १०:०० वाजता आहे.(२)एफ एल-२ या दुकानाची संख्या १ असून दुकान उघडण्याची वेळ सकाळी १०:०० वाजता असून बंद करण्याची वेळ रात्री १०:०० वाजता आहे.(३)एफएल-३ या दुकानाची संख्या शहरांमध्ये १४ असून दुकान उघडण्याची वेळ सकाळी ११:३० असून बंद करण्याची वेळ रात्री ११:० आहे.(४)एफएल बीआर-२ या दुकानाची संख्या शहरांमध्ये ५ असून दुकान उघडण्याची वेळ सकाळी १०:०० वाजता असून बंद करण्याची वेळ रात्री १०:०० वाजता आहे. अशाप्रकारे शहरातील दारूचे दुकान उघडण्याचे व बंद करण्याचे शासनाचे नियम असून कारंजा शहरातील व्यवसायिक मात्र या नियमाची ऐशी तैशी करून आपली देशी विदेशी दारूचे दुकानात चालवत असून यावर अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क अधिकारी यांना तक्रार देऊन सुद्धा कोणती कारवाई झाली नाही.फक्त दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क मंगरूळपीर हे कोणती कारवाई न करता फक्त हप्ता वसुली करण्याकरता कारंजा शहरात येतात अशी चर्चा आहे.

# बांधकाम कामगारांच्या भांडी संच वाटपातील भोंगळ कारभार चव्हाट्यावर !

*दलालांचे साखळी गैरप्रकार व मजुरांची उघड लूट
* दोषी अधिकारी व संबंधितावर गुन्हे दाखल करा - बालाजी मोरे

● दिपक मापारी @ रिसोड ●

वाशिम जिल्ह्यातील अनसिंग येथे सुरू असलेला भांडी संच वाटपाचा प्रकार हा केवळ निष्काळजीपणा नसून थेट मजुरांच्या हक्कावरचा दरोडा आहे. शासनाने गरीब बांधकाम कामगारांचे जीवनमान उंचावण्यासाठी दिलेल्या योजनेचा येथे उघडपणे बाजार मांडण्यात आला असून प्रशासनाचा 'फ्लॉप शो' उघड झाला आहे.

अनसिंग केंद्रावर कामगारांना भांडी संच देण्याऐवजी केवळ भांड्यांसोबत फोटो काढून 'वाटप पूर्ण' दाखवले जात आहे आणि प्रत्यक्षात कामगारांना रिकाम्या हाताने घरी पाठवले जात आहे. हा प्रकार म्हणजे मजुरांच्या घामाची थट्टा असून, कागदोपत्री यश दाखवण्यासाठी चालवलेली ही लबाडी तात्काळ थांबवली पाहिजे.याहून गंभीर बाब म्हणजे, केंद्रावर काही दलालांकडून कामगारांना '?१७०० रुपये द्या, भांडे किट देतो' असे आमिष दाखवून उघडपणे फसवणूक केली जात आहे. गरीब मजुरांच्या अज्ञानाचा व गरजेचा गैरफायदा घेत हा दलालशाहीचा खेळ सुरू असून प्रशासन याकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत आहे का? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.तसेच केंद्रावरील परिस्थिती अत्यंत अमानुष आहे –पहाटेपासून रांगेत उभ्या असलेल्या कामगारांसाठी पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही.कडक उन्हात सावली, मंडप किंवा बसण्याची कोणतीही सोय नाही.अन्न-पाण्याविना ताटकळत असलेल्या कामगारांकडे अधिकारी पूर्णतः दुर्लक्ष करत आहेत.हे सर्व प्रकार पाहता, हा केवळ निष्काळजीपणा नसून संगनमताने चालणारा भ्रष्टाचार असल्याचा संशय बळावला आहे.



मजुरांच्या हक्काच्या साहित्याचा अपहार करून दलालांच्या माध्यमातून पैसा उकळण्याचा हा प्रकार तात्काळ थांबवला नाही, तर प्रशासनाविरुद्ध तीव्र जनआक्रोश उसळल्याशिवाय राहणार नाही.

म्हणून आम्ही ठाम मागणी करीत आहोत की –अनसिंग येथील संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी.भांडी संच वाटपातील गैरप्रकार व दलालांकडून घेतल्या जाणाऱ्या ?१७०० रुपयांच्या लुटीमध्ये सहभागी असलेल्या अधिकारी व संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत.सर्व पात्र कामगारांना त्यांचा भांडी संच त्वरित, पारदर्शक पद्धतीने व सन्मानाने वितरित करण्यात यावा.केंद्रावर पिण्याचे पाणी, सावली, बसण्याची व्यवस्था यासह सर्व मूलभूत सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात.अन्यथा, क्रांतिकारी शेतकरी संघटना यांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,आणि त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, याची नोंद घ्यावी.

'मजुरांच्या घामाची लूट सहन केली जाणार नाही - हक्क मिळेपर्यंत लढा सुरूच राहील!'यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष गजानन कावरखे ,वाशिम जिल्हाध्यक्ष बालाजी मोरे पाटील ,तालुकाध्यक्ष प्रविण मते, उपस्थित होते.



सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# दरोड्याच्या तयारीत असलेल्या टोळीकडून बंदूक, जिवंत काडतूस, चारचाकी जप्त !

प्रतिनिधी २५ एप्रिल

**शेगांव :** दरोडा टाकण्याच्या उद्देशाने एकत्र जमलेल्या गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या नंतर शेगाव ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणाचा सखोल तपास करत गुन्ह्यात वापरलेले शस्त्र व वाहन जप्त करण्यात यश मिळविले आहे. पोलिसांनी १२ बोअरची बंदूक, ७.० मिमीचे जिवंत काडतूस, तसेच गुन्ह्यासाठी वापरलेली चारचाकी वाहन जप्त केले.

शेगाव ग्रामीण पोलिस ठाण्याच्या हद्दीत २१ एप्रिल रोजी काही व्यक्ती दरोडा टाकण्याच्या पूर्वतयारीसाठी एकत्र जमल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ सापळा रचून पाच आरोपींना अटक केली. त्यावेळी त्यांच्या ताब्यातून शस्त्रे, मोटारसायकल व रोख रक्कम जप्त करण्यात आली होती. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१०(४) व (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलिस करीत आहेत. तपास पथकात शेगाव ग्रामीणचे ठाणेदार पोलिस निरीक्षक पितांबर जाधव, तपास अधिकारी सहायक पोलिस निरीक्षक प्रवीण लिंगाडे, नंदकिशोर तिवारी, उमेश आखरे व मंगेश पाटकर यांचा समावेश होता.

अटक करण्यात आलेल्या आरोपींपैकी जमील हुसेन इनामुलल्ला (रा. बहाणपूर) हा पोलिस कोठडीत असताना त्याने तपासादरम्यान धक्कादायक खुलासा केला.

त्याने गुन्ह्याच्या वेळी त्याच्याकडे असलेली १२ बोअरची बंदूक जानोरी येथील घटनास्थळाजवळ लपवून ठेवल्याची कबुली दिली. पोलिसांनी २३ एप्रिल रोजी कारवाई करत ती बंदूक आणि ७.० एमएमचे एक जिवंत काडतूस जप्त केले आहे. आरोपींनी बहाणपूर-शेगाव प्रवासासाठी आणि शस्त्र वाहून नेण्यासाठी एका लाल रंगाच्या चारचाकीचा वापर केला होता. २४ एप्रिल रोजी पोलिसांनी कारवाई करत, लाल रंगाची कार (क्रमांक एमपी ६८-सी ४७८६) ही गाडी मिल्लतनगर, शेगाव येथून जप्त केली. ही गाडी आरोपी शरीफ अहमद शहीद अहमद (रा. बहाणपूर) याच्याकडून हस्तगत करण्यात आली आहे.

# प्राथमिक आरोग्य केंद्रात वर्षभरात तिसऱ्यांदा आग

प्रतिनिधी २५ एप्रिल

**पिंपळगाव राजा येथील आरोग्य केंद्रात पाणी टाकून आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले**

**खामगाव :** पिंपळगाव राजा येथील जुन्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारतीला दि. २२ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास पुन्हा आग लागल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे, याच इमारतीत वर्षभरात ही तिसरी घटना असून, आग लागण्यामागील कारण अद्यापही अस्पष्ट असल्याने संशयाचे सावट निर्माण झाले आहे. इमारतीत सध्या लहान मुलांच्या लसीकरणाचे काम सुरू आहे. अशा संवेदनशील ठिकाणी वारंवार आग लागणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे.रुग्णसंख्या मोठी असताना मनुष्यबळाची कमतरता असल्याचे चित्र आहे. वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांकडे आरोग्य विभाग दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. तसेच, आगीचे नेमके कारण शोधण्यात संबंधित यंत्रणा अपयशी ठरत असल्याची नाराजीही व्यक्त होत आहे. दरम्यान, ज्या ठिकाणी आग लागली त्या जुन्या इमारतीत वीज जोडणी किंवा वायरिंग नसल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी ने दिली.

# जोडणीला विलंब ; वीज ग्राहक मंचाचा महावितरणला दणका !

**♦ जोडणीसह नुकसानभरपाई देण्याचा आदेश**

प्रतिनिधी २५ एप्रिल

**खामगाव :** नवीन वीजजोडणी देण्यात अनावश्यक विलंब केल्याबद्दल वीज ग्राहक तक्रार निवारण मंचाने महावितरणला फटकारत अर्जदाराला ८ दिवसांच्या आत वीजजोडणी देण्याचा तसेच विलंबाबद्दल नुकसानभरपाई अदा करण्याचा आदेश दिला. या निर्णयामुळे ग्राहकांना आहे. दिलासा मिळाला

जळगाव जामोद तालुक्यातील राजुरा बु, येथील शेतकरी शेख आमद शेख अब्बास यांनी त्यांच्या पोल्ट्री युनिटसाठी २० ऑक्टोबर २०२५ रोजी महावितरणकडे नवीन वीज? जोडणीसाठी अर्ज केला होता. नियमानुसार, अशा प्रकरणांत एका महिन्याच्या आत कोटेशन देणे आणि जास्तीत जास्त २० दिवसांत वीजपुरवठा करणे अपेक्षित असते; मात्र संबंधित प्रकरणात महावितरणकडून तब्बल चार महिन्यांनंतर, म्हणजे १८ फेब्रुवारी २०२६ रोजी कोटेशन देण्यात आले. त्यानंतर अर्जदाराने २७ फेब्रुवारी २०२६ रोजी १६,०१९ रुपयांची अनामत रक्कम भरली; तरीही त्यांना वीजजोडणी मिळाली नाही. परिणामी, पोल्ट्री व्यवसायाचे आर्थिक नुकसान होत असल्याने त्यांनी ग्राहक मंचाकडे दाद मागितली. सुनावणी दरम्यान महावितरणने 'व्हेंडर असाइनमेंट' प्रक्रियेत तांत्रिक अडचणी आल्यामुळे विलंब झाल्याचे स्पष्टीकरण दिले. मात्र, मंचाने हा युक्तिवाद अमान्य करत सहा महिन्यांचा विलंब हा गंभीर गैरप्रकार असून, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाच्या नियमांचे उल्लंघन असल्याचे नमूद केले. अध्यक्ष ओमप्रकाश भुतडा, सदस्य जयश्री खांडेभराड व तांत्रिक सदस्य धीरज चव्हाण यांच्या खंडपीठाने २२ एप्रिल २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार, अर्जदाराच्या पोल्ट्री युनिटला पुढील ८ दिवसांत वीजजोडणी देणे बंधनकारक आहे. विलंबाबद्दल एकूण ६०० रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# खामगावात किसान सभेच्या अधिवेशनाची लगबग

प्रतिनिधी २५ एप्रिल

**खामगाव:** अखिल भारतीय किसान सभेच्या १४ व्या बुलढाणा जिल्हा अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर तयारीला वेग आला असून, या अधिवेशनासाठी राज्यातील प्रमुख नेते खामगावात दाखल झाले आहेत.

किसान सभेचे राज्य सचिव कॉम्रेड अजित नवले आणि राज्य अध्यक्ष कॉम्रेड उमेश देशमुख हे जिल्हाध्यक्ष कॉम्रेड जितेंद्रकुमार चोपडे यांच्या समवेत खामगाव येथे दाखल झाले. त्यांच्या आगमनामुळे अधिवेशनाच्या आयोजनाला उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी संग्रामपूर तालुक्यातील वानखेड फाटा येथील कॉम्रेड रामलाल अहिऱ्या सभागृहात हे अधिवेशन पार पडणार आहे. या अधिवेशनात शेतकरी प्रश्न, शेती धोरणे आणि संघटनात्मक बळकटीकरण यावर सविस्तर चर्चा होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. दरम्यान, अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक कार्यकर्ते सज्ज झाले असून, विविध स्तरांवर तयारी सुरू आहे.

# कारवाईदरम्यान वाळू माफियाने वाहन घेऊन काढला पळ

प्रतिनिधी २५ एप्रिल

**♦ संग्रामपुरात प्रशासनाला माफियाचे आव्हान**

**संग्रामपूर :** कारवाईसाठी गेलेल्या महसूल अधिकाऱ्यां समोरच चालकाने वाळूने भरलेले वाहन पळवून नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे वाळू माफियांचा वाढता दबदबा आणि प्रशासनासमोर उभे ठाकलेले आव्हान अधोरेखित झाले आहे.ही घटना ग्राम काकनवाडा (ता. संग्रामपूर) येथील वान नदी पात्रावरील पुलाजवळ घडली. याप्रकरणी दि. २१ रोजी तामगाव पोलिस ठाण्यात आरोपी चालक हासम शाह (रा. माळेगाव, ता. तेल्हारा, जि. अकोला) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तहसीलदार प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम महसूल अधिकारी श्रीकृष्ण सोनोने व देवेंद्र बोडखे (एकलारा) हे वाळूच्या अवैध वाहतुकीवर कारवाईसाठी काकनवाडा येथे गेले होते. यावेळी काकनवाडा-तेल्हारा मार्गावरील वान नदी पुलाजवळ त्यांना विनाक्रमांकाचा लाल रंगाचा ट्रॅक्टर ट्रॉलीसह दिसून आला. तपासणी केली असता त्यात अंदाजे दीड ब्रास वाळू आढळली. चालकाकडे वाळू वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पंचनामा सुरू असताना चालकाने अचानक वाहनासह पळ काढला.महसूल अधिकाऱ्यांनी पाठलाग केला; मात्र ट्रॅक्टर हाती लागला नाही. दरम्यान, ग्राम महसूल अधिकारी श्रीकृष्ण सोनोने यांच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२), २२१ तसेच खाण व खनिज कायदा कलम २१ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# शेगाव येथे श्रीराम कथा ज्ञानयज्ञाचे आयोजन

प्रतिनिधी २५ एप्रिल

**शेगाव :** येथील गुरू गजानन आध्यात्म परिवार शेगांव यांच्या वतीने श्रीराम कथा ज्ञानयज्ञाची तयारी पूर्ण. कथा वाचक श्री श्री १००८ महामंडलेश्वर साध्वी सत्यप्रिया गिरी श्री तपो निधी निरंजनी अखाडा यांच्या



सुमधून अमृतवाणीतून श्रीराम कथा होणार आहे. श्रीराम कथा शुक्रवार २४ एप्रिल ते ३० एप्रिल गुरुवार पर्यंत श्रीराम नगर रेल्वे स्टेशन रोड एचडीएफसी बँक समोर खामगाव रोड शेगाव येथे श्रीराम कथा राहणार आहे. कथा वेळ. सायंकाळी ५ ते रात्री ८ पर्यंत राहील. दररोज रात्री ८ ते ९ या वेळेत कथा ऐकण्यासाठी आलेल्या सर्व भाविकांसाठी निशुल्क भोजन व्यवस्था चे आयोजन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. श्रीराम कथा श्रवणाचा पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आरटीई प्रवेश प्रक्रियेला ३० पर्यंत मुदतवाढ

प्रतिनिधी २५ एप्रिल

**सोडतीत दोन हजार ८०१ विद्यार्थ्यांची निवड**

**खामगाव :** शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमधील २५ टक्के राखीव जागांसाठी सुरू असलेल्या प्रवेश प्रक्रियेला प्रशासनाने ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे पालकांना कागदपत्रांची पडताळणी पूर्ण करून मुलांचे प्रवेश निश्चित करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळाला आहे. दरम्यान, गुरुवारपर्यंत १ हजार ७९७विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाल्याची माहिती समोर आली आहे.

२२६ खासगी जिल्ह्यातील शाळांमध्ये एकूण २ हजार ९३३ जागा उपलब्ध असून, त्यासाठी तब्बल ६ हजार १७१ अर्ज प्राप्त झाले आहेत.प्रवेश निश्चित करताना आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, उत्पन्न व रहिवासी दाखले, तसेच ऑनलाइन प्रक्रियेमधील तांत्रिक अडचणी यामुळे अनेक पालकांना वेळेत प्रक्रिया पूर्ण करता आली नव्हती. या पार्श्वभूमीवर मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

**अंमलबजावणीत हे येताहेत अडथळे**

तज्ज्ञांच्या मते, आरटीई अंतर्गत प्रवेश मिळाल्यानंतरही काही ठिकाणी शाळा व्यवस्थापन आणि पालक यांच्यात समन्वयाचा अभाव, शुल्काबाबतचे गैरसमज, तसेच शासकीय अनुदानाच्या विलंबामुळे अडचणी निर्माण होतात. त्यामुळे केवळ प्रवेश मिळवून देणे पुरेसे नसून, विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण शिक्षणासाठी प्रभावी देखरेख आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

**पुढील प्रक्रिया महत्त्वाची**

३० एप्रिलपर्यंत प्रवेश निश्चित न करणाऱ्या पालकांच्या जागा पुढील प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना देण्यात येऊ शकतात. त्यामुळे निवड झालेल्या पालकांनी वेळेत कागदपत्रे सादर करून प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. आरटीई अंतर्गत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळत असल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील पालकांचा खासगी शाळांकडे कल वाढत आहे.

# अपर मुख्य सचिवांकडून उपविभागीय कार्यालयाची पाहणी

प्रतिनिधी २५ एप्रिल

**♦ ऑनलाइन प्रणालीचा प्रभावी वापर करण्याच्या सूचना**

**खामगाव :** राज्याच्या महसूल विभागाचे कामकाजाची सविस्तर पाहणी केली. यावेळी नागरिकांना सेवा देताना ऑनलाइन प्रणालीचा अधिकाधिक व प्रभावी वापर करण्याच्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी खामगाव उपविभागातील शेगाव व खामगाव येथील विविध महसूल कार्यालयांना भेट देत आहेत. दौऱ्यादरम्यान त्यांनी शेगाव येथील तहसील कार्यालय, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय तसेच सहनिबंधक कार्यालयाची पाहणी केली. कार्यालयीन कामकाज, अभिलेख व्यवस्थापन व सेवा वितरण प्रक्रियेचा आढावा घेत आवश्यक सुधारणा करण्याचे निर्देश त्यांनी दिले. यानंतर खामगाव येथील सेतू सुविधा केंद्रास भेट देऊन विविध प्रमाणपत्रे व सेवा देताना ऑनलाइन प्रणालीचा कार्यक्षम वापर करून नागरिकांना सेवा वेळेत उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. तसेच तहसील कार्यालय, खामगाव येथेही कामकाजाचा आढावा घेण्यात आला. उपविभागीय अधिकारी कार्यालय, खामगाव येथे खारगे यांच्या अध्यक्षतेखाली विविध विभागांच्या प्रमुखांची आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीत महसूल व इतर विभागांच्या कामकाजाची प्रगती, अडचणी व त्यावरील उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तक्रार निवारण प्रक्रियेला गती देणे आणि सेवा वितरणात पारदर्शकता राखण्यावर त्यांनी विशेष भर दिला. या दौऱ्यावेळी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण कुमार देवरे, उपविभागीय अधिकारी शैलेश काळे, तहसीलदार सुनील पाटील, तहसीलदार प्रज्ञा काकडे उपस्थित होते.

# खामगाव शहरात जलवाहिनी फुटल्याने लाखो लीटर पाण्याचा अपव्यय !

प्रतिनिधी २५ एप्रिल

**खामगाव :** शहरातील घाटपुरी नाक्याजवळ नाली क्रॉसिंगसाठी सुरू असलेल्या खोदकाम दरम्यान २३ एप्रिल रोजी दुपारी सुमारे ४:३० वाजता ३५० मिमी क्षमतेची मुख्य जलवाहिनी फुटल्याची घटना घडली. या घटनेमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होऊन लाखो लिटर पाणी वाया गेले घटनेची माहिती मिळताच नगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि दुरुस्तीचे काम हाती घेतले. या घटनेमुळे परिसरातील पाणीपुरवठा काही



काळ विस्कळीत झाला होता. संबंधित यंत्रणेकडून पाइपलाइन दुरुस्त करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, शहरात अशा प्रकारच्या पाइपलाइन फुटण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

**कायमस्वरूपी तोडगा काढण्याची मागणी**

शहरात वारंवार उद्भवणाऱ्या जलवाहिनी फुटीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी प्रशासनाने यावर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. सतत होणाऱ्या गळतीमुळे पाणीपुरवठ्यावर परिणाम होत असून पाण्याचा अपव्यय होत आहे.

# निलंबीत ग्रामसेवक गणेश पायघन यांनी केलेल्या आर्थिक अफरातफर प्रकरणी; जिपोअ यांचेकडे कारवाईची मागणी

प्रतिनिधी २५ एप्रिल

**बुलढाणा :** तालुक्यातील कोलवड ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक गणेश साहेबराव पायघन यांनी १५ वा वित्त आयोग आणि इतर शासकीय योजनामध्ये लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केल्याप्रकरणी वरिष्ठ अधिकारी यांनी त्यांना निलंबित केले आहे.

सदर प्रकरण हे समाजसेवक निलेश कोंडूबा गायकवाड यांनी जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले असून गायकवाड यांनी सतत पाठपुरावा केल्यामुळे पायघन यांनी त्यांना जातीयवाचक शिवीगाळ केली. या संदर्भातील सर्व पुरावे तक्रारदाराकडे उपलब्ध आहेत. या संदर्भात ३ ते ४ वर्षाचे ग्रामपंचायत कार्यालयामध्ये सदर प्रकरणाशी संबंधीत असलेले शासकीय रेकॉर्ड हे पायघन यांनी स्वतःचे ताब्यात ठेवले असून पंचायत समितीने पंचनामा केला असता ग्रामपंचायत कार्यालयात कुठलेही दप्तर आढळले नाही, सदर दप्तर ग्रामपंचायतमध्ये उपलब्ध नसल्याने पाणी पुरवठा, वीज आणि आरोग्य तसेच जनतेची व गावाची दुरावस्था दिसून येत असून सर्व सेवा विस्कळीत झाल्या आहेत. न्यायालयाच्या नावाखाली रेकॉर्ड अडवून धरल्याने ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सदर ग्रामपंचायतचे रेकॉर्ड निलंबीत ग्रामसेवक गणेश पायघन यांचेवर वरिष्ठ स्तरावरुन कठोर कारवाई करुन सर्व रेकॉर्ड हस्तगत करावे व अपहाराची रक्कम संबंधीतांकडून वसूल करुन शासनखाती जमा करावे. अन्यथा लोकशाहीच्या मार्गाने आमरण उपोषण करीत असल्याचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षक बुलडाणा यांना निलेश गायकवाड यांनी दिले असून होणाऱ्या परिणामास सर्वस्वी प्रशासन व ग्रामसेवक जबाबदार राहील असा ईशारा त्यांनी निवेदनात दिला आहे.

# बोथाकाजी येथे महामानवांचा जयंती महोत्सव

प्रतिनिधी २५ एप्रिल




**खामगाव :** विश्वातील प्रत्येक मनुष्याचे कल्याण तथागत गौतम बुद्धाने सांगितलेल्या धम्म मार्गानेच होते त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. व्यावहारिक दृष्टीने धम्म हा प्रत्येक मनुष्याच्या सुखासाठी आवश्यक आहे. तथागत गौतम बुद्धाने दिलेल्या धम्माचे पालन केल्यानेच मनुष्य दुःखातून मुक्त होतो असे प्रतिपादन भंते ज्ञानरक्षित महाथेरो यांनी धम्मदेशना करताना केले. तालुक्यातील बोथाकाजी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांच्या संयुक्त जयंती महोत्सवानिमित्त तीन दिवशीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.२७ एप्रिल रोजी सकाळी ८ वाजता ट्रस्टचे अध्यक्ष पी.जे.हिवराळे यांच्या हस्ते धम्म ध्वजारोहण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यानंतर महापुरुषांच्या जीवनावर आयुष संदीप हिवराळे, आरोही योगेश हिवराळे, आर्वी अविनाश हिवराळे हिवराळे, मोहित सतीश हिवराळे, वीर अमोल हिवराळे, क्षितिज संतोष अंभोरे, अश्विनी गौतम हिवराळे, विजया वानखडे या मुला मुलींनी भाषणे दिली. १८ एप्रिल रोजी भंते गुणरत्न महाथेरो नंदुरबार यांच्या हस्ते महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यानंतर भंतेजी यांनी प्रवचनांमध्ये मानवाच्या जीवनामध्ये जीवन जगत असताना धम्माची नितांत गरज असते. त्याविना तो सुखी जीवन जगू शकत नाही.धम्माचा विविध अंगावर भंतेजींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. १९ एप्रिल रोजी समाजकार्य आणि धम्मकार्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या प्रा. मुकुंद भारसाकळे, अशोक इंगळे, एस एम.पांडे, किरण खंडारे, धम्मबोधी डोंगरे, मनोहर वानखडे यांना समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ट्रस्टचे सचिव गणेश हिवराळे यांनी, सूत्रसंचालन सदानंद हिवराळे यांनी तर आभार प्रदर्शन शिक्षक दीपक पारवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ट्रस्टचे सर्व विश्वस्त, भिमशक्ती क्रीडा मंडळाचे,पंचशील महिला मंडळ, विशाखा महिला संघ,रमाई महिला संघ तथा बौद्ध उपासक उपासिका यांनी परिश्रम घेतले.

# डिजिटल पाऊल, प्रगतीचे देऊळ : 2027 ची पहिली ऑनलाईन जनगणना

प्रतिनिधी २५ एप्रिल

**खामगाव :** भारत सरकारतर्फे आयोजित करण्यात येणारी 'जनगणना २०२७' ही देशातील पहिली पूर्णतः डिजिटल व हायटेक जनगणना ठरणार असून, तिचा पहिला टप्पा एप्रिल-मे २०२६ पासून सुरू होणार आहे. या जनगणनेमध्ये अत्याधुनिक 'जिओ-रेफरन्सिंग' तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येक घराची अचूक नोंद डिजिटल पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यामुळे कोणतेही घर वंचित राहणार नाही तसेच पुनर्गणना होण्याची शक्यता टाळली जाईल.

जनगणना प्रक्रियेचा पहिला टप्पा 'हाऊस लिस्टिंग' (प्दले थ्रेूगु) म्हणून ओळखला जाईल, जो महाराष्ट्रात १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडणार आहे. यापूर्वी नागरिकांना स्वतःहून माहिती भरण्याची 'एर्त-हिंल्र्सूग्दह' सुविधा १ मे २०२६ पासून उपलब्ध होणार असून, ही विंडो साधारण १५ दिवसांसाठी खुली राहील. दुसरा टप्पा 'लोकसंख्या गणना' फेब्रुवारी २०२७ मध्ये होणार आहे. या प्रक्रियेसाठी नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळ प्र्जे://ा.महेले,ुदन.ग्ह?? वर जाऊन नोंदणी करणे अपेक्षित आहे. नोंदणी करताना कुटुंबप्रमुखाचे नाव व मोबाईल क्रमांक आवश्यक असून, एका मोबाईल क्रमांकावरून एकाच घराची नोंद करता येईल. नोंदणी पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना 'एर्घ्ि' प्रदान करण्यात येईल, जो पुढील पडताळणी प्रक्रियेसाठी आवश्यक असेल. एर्त-हिंल्र्सूग्दह करताना नागरिकांनी १६ भाषांपैकी एक भाषा निवडून ध्ऊइ्द्वारे पडताळणी करणे, घराचा अचूक पत्ता नकाशावर चिन्हांकित करणे तसेच हाऊस लिस्टिंगशी संबंधित ३३ प्रश्नांची अचूक उत्तरे देणे आवश्यक आहे. अंतिम सबमिट केल्यानंतर कोणताही बदल करता येणार नाही. जनगणना अधिकाऱ्यांकडून घरोघरी भेट देऊन माहितीची पडताळणी केली जाईल. या वेळी नागरिकांनी एर्घ्ि सादर केल्यास माहितीची पडताळणी सुलभ होईल. महत्त्वाचे म्हणजे, या जनगणनेदरम्यान नागरिकांकडून उत्पन्न, बँक तपशील किंवा कोणतीही वैयक्तिक कागदपत्रे मागवली जाणार नाहीत. तसेच डेटा सुरक्षिततेसाठी उच्चस्तरीय उपाययोजना करण्यात आल्या असून, जनगणना माहिती 'राष्ट्रीय महत्त्वाच्या माहिती संरचने'च्या सुरक्षेखाली ठेवण्यात येणार आहे. केवळ अधिकृत अधिकारीच बायोमेट्रिक व डिजिटल सिग्नेचरच्या माध्यमातून हा डेटा पाहू शकतील. डेटा लीक केल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल. जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत या प्रक्रियेस कायदेशीर बळ देण्यात आले असून, कामात अडथळा आणणाऱ्या किंवा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशाराही प्रशासनाने दिला आहे. तहसीलदार खामगाव श्री. सुनिल पाटील यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, १ मे २०२६ पासून सुरू होणाऱ्या एर्त-हिंल्र्सूग्दह प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा तसेच जनगणना अधिकाऱ्यांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, जेणेकरून जनगणना १०० टक्के यशस्वी होईल.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# तीव्र उन्हामुळे होरपळत आहे जनता, मनपाच्या उपाययोजना अपुऱ्या

प्रतिनिधी २५ एप्रिल

◆ प्रमुख चौकातील सिग्नलवर ग्रीन शेडनेट लावण्याची मागणी



**अकोला :** शहर तीव्र उष्णतेच्या लाटेने त्रस्त आहे. तापमान ४५ अंशाच्या पुढे जाण्याची शक्यता असल्याने शहरातील प्रमुख चौकांमध्ये लाल सिग्नल वर थांबणे ही एक मोठी अग्नी परीक्षा नागरिकांसाठी ठरत आहे. भीषण उन्हाने लोक त्रस्त आहेत, तर दुसरीकडे प्रतिबंधात्मक उपाययोजना अपूर्ण आहेत. शहरातील एकाही प्रमुख चौकामध्ये महापालिकेतर्फे ग्रीन शेडनेट बसविण्यात आलेली नाही. यावर्षी एप्रिल महिना संपत आला तरी अद्याप एकाही चौकात ग्रीन शेडनेट बसविण्यात आलेली नाही. दिवसाढवळ्याही वाहन चालकांना हिरव्या सिग्नलची वाट पाहत कड़क उन्हात उभे राहावे लागत आहे. त्यामुळे महापालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. शहरात उष्माघातामुळे एकही मृत्यूची नोंद झालेली नाही. तीव्र




उष्णतेमुळे तहानलेल्या नागरिकांसाठी महापालिकेने पाणपोया उभारल्या आहेत. सर्वोपचार रुग्णालय वगळता महापालिकेच्या एकाही दवाखान्यात शीत कक्षाची व्यवस्था नसल्याचे दिसून येत आहे. नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेची उद्याने उघडी ठेवण्यात आली आहेत परंतु या ठिकाणी सफाई चा अभाव असल्याने सर्वत्र अस्वच्छता दिसून येत आहे. सरकारी इमारतींमध्ये नागरिकांसाठी स्वच्छतागृहे असल्याचा दावा केला जात आहे. परंतु ती किती आहेत याची कोणतीही माहिती नाही. तसेच किती भिकाऱ्यांना निवारागृहात नेण्यात आले याची सुद्धा कोणतीही माहिती मिळत नाही. अनेक भिकारी रेल्वे स्टेशन समोर तसेच शहरातील उड्डाणपुलाखाली रात्र घालवीत असल्याचे दिसून येत आहे. गेल्या दोन आठवड्यापासून शहरात असलेल्या तीव्र उष्णतेमुळे उष्माघात प्रतिबंधक योजनेचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत, शाळांच्या वेळा बदलण्यात आल्या आहेत, परंतु सर्वात जास्त त्रास नागरिकांना शहरातील प्रमुख चौकांमध्ये असलेल्या सिग्नल वर होत आहे त्यामुळे या ठिकाणी ग्रीन शेडनेट लावण्याची मागणी नागरिक करीत आहेत.

# चोरट्यांनी फोडले पोलीस कर्मचाऱ्याच्या भावाचे घर

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोला :** खदान पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या शास्त्री नगर परिसरात एका पोलीस कर्मचाऱ्यांच्या भावाच्या घरी घरफोडीची घटना समोर आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस कर्मचाऱ्यांच्या भावाच्या घरातच चोरट्यांनी चोरी केल्याने पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. प्राप्त माहितीनुसार अंकुश घनबहादूर यांच्या निवासस्थानी ही घरफोडी झाली. अंकुश घनबहादुर व त्यांचे कुटुंबीय काही कामानिमित्त घराबाहेर गेले होते. सायंकाळी सहा ते सात वाजताच्या सुमारास ते परत घरी आले असता, घराची खिडकी तुटलेल्या अवस्थेत दिसून आली. घरात प्रवेश केल्यावर अज्ञात चोरट्याने घरात घुसून चोरी केल्याचे स्पष्ट झाले. चोरट्यांनी घरातील एका खोलीतून सुमारे एक लाख रुपये रोख रक्कम, तीस हजार रुपयांचे घड्याळ, तसेच सुमारे पाच ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी असा एकूण जवळपास दोन लाख रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. याप्रकरणी अंकुश घनबहादूर यांनी खदान पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असून पोलिसांनी अज्ञात चोरटया विरोधात चोरीचा गुन्हा नोंदवला आहे.



**पोलिसांच्या नातेवाईकांची घरेच सुरक्षित नाहीत तर अन्य नागरिकांचे काय?**

◆ शहरात चोरींच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. या चोरीच्या घटनेमुळे पोलीस कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांची घरेच जर सुरक्षित नसतील तर इतर नागरिकांचे काय? हा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. हे पाहता पोलिसांनी आपली गस्त वाढवावी अशी मागणी होत आहे

# चांदूर येथे शेतात लागलेल्या आगीत केळी पिकाचे मोठे नुकसान

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोट :** तालुक्यातील मौजे चांदूर येथे शेतात लागलेल्या आगीत शेतकरी गजानन खडसे यांच्या केळी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची घटना समोर आली आहे. सलग दोन दिवस लागलेल्या आगीमुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट कोसळले असून प्रशासनाकडून मदतीची मागणी करण्यात येत आहे.

मौजे चांदूर येथील सर्वे क्रमांक १०१/३ मधील शेतकरी गजानन प्रल्हादराव खडसे यांच्या शेतात दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी सुमारे ९:३० वाजताच्या सुमारास अचानक आग लागल्याची घटना घडली. या आगीत केळी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.यापूर्वी दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी रात्रीच्या सुमारासही याच शेतात आग लागून पिकाचे नुकसान झाले होते. सलग दोन दिवस झालेल्या या घटनांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतात केळी पिकासाठी खासगी कंपनीसोबत करार करण्यात आला होता. या आगीत सुमारे १६ केळीची झाडे जळून खाक झाली असून १५ इन्च पाइपचेही नुकसान झाले आहे. अंदाजे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

# लिनेस क्लब चार्टर डे आणि मासिक सभा संपन्न

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोला :** लिनेस क्लब चार्टर डे आणि वैशाख महिन्याचे औचित्य साधून, २० एप्रिल रोजी हॉटेल सेंटर प्लाझा येथे लिनेस क्लब ऑफ अकोलाची मासिक सभा अत्यंत उत्साही वातावरणात झाली.

या प्रसंगी उन्हाळ्यापासून दिलासा मिळण्यासाठी 'शीतपेय स्पर्धेचे' आयोजन करण्यात आले होते. यामध्ये लि. सुलेखा गुप्ता यांनी प्रथम, लि. भारती खंडेलवाल यांनी द्वितीय तर लि. श्रद्धा जोशी यांनी तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. उन्हाळा लक्षात घेऊन पशू-पक्ष्यांसाठी जलपात्र वितरण केले. पी.डी.पी. लि. हरविंदर कौर सेठी आणि भारती खंडेलवाल यांनी पक्ष्यांच्या दाणा-पाण्यासाठी जलपात्र वितरणाचा प्रकल्प राबवला. पर्यावरण पूरक पिशव्या प्रकल्पात माजी अध्यक्षा लि. प्रियंका पडगीलवार यांच्या हस्ते २०० नॉन-वोव्हन पिशव्यांचे विमोचन करण्यात आले. आई ते मुलगी सवाई या प्रकल्पांतर्गत पोलीस कॉन्स्टेबल अनु मल्ली यांचा शाल, श्रीफळ आणि भेट प्रमाणपत्र देऊन क्लबच्या अध्यक्षा राजेश्री समनपुरे यांनी गौरव केला. क्लबच्या पी.डी.पी. डॉ. तारा माहेश्वरी यांचा नातू आणि स्पोर्ट्स सायंटिस्ट प्रत्यूष माहेश्वरी याने ६० वर्षांनंतरचे शारीरिक व मानसिक आरोग्य, नियमित व्यायाम आणि आहार-विहार यावर मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांना रोप आणि भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. चार्टर डे निमित्त चार्टर प्रेसिडेंट आणि सध्याच्या रिजन चेअरपर्सन लि. ममताजी सूर्या यांचा मुकुट परिधान करून, केक कापून आणि भेटवस्तू देऊन विशेष सन्मान करण्यात आला. 'व्हाईस मल्टिपल प्रेसिडेंट' पदी निवड झाल्याबद्दल पी.डी.पी. लि. उषाजी बाहेती यांचा सत्कार करण्यात आला. पी.डी.पी. स्वातीजी झुनझुनवाला यांच्या वाढदिवसानिमित्त अध्यक्षांनी त्यांना भेटवस्तू व रोप देऊन शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाला व्हाईस मल्टिपल प्रेसिडेंट लि. उषाजी बाहेती आणि डिस्ट्रिक्ट प्रेसिडेंट लि. कल्पनाजी देशमुख यांची गरिमामय उपस्थिती लाभली. सभेचे नेटके आयोजन पी.डी.पी. लि. हरविंदर कौर सेठी, डॉ. तारा माहेश्वरी, आशा वीरवानी, सुनंदा गुप्ता, स्वाती झुनझुनवाला आणि स्मिता खेतान यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी, क्रीम रंगाच्या साड्या परिधान केलेल्या सर्व लिनेस सखींनी क्लबच्या बॅनरचा सन्मान करत, हातात रोप, तिरंगी रिबन आणि दिवे घेऊन एक प्रतिकात्मक वॉक केला. हे हरियाली, अंधार दूर करणे, एकता आणि राष्ट्रभक्तीचे प्रतीक होते. संगीतमय वातावरणात हा सोहळा रंगला. झिरो बजेट प्रोजेक्ट मध्ये प्रोजेक्ट इंचार्ज पी.डी.पी. स्वाती झुनझुनवाला यांनी लि. इंदु तिवारी, प्रेमाजी मुंदडा आणि दीना शाह यांची निवड करून त्यांना पारितोषिके दिली. सभेचे उत्कृष्ट संचालन क्लब सेक्रेटरी लि. वनिता बिजवे आणि कोषाध्यक्ष लि. अल्का उमाळे यांनी केले. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाला रुपल लोटीया, अनिता केडिया, अनिशा वखरिया, धर्मिष्ठा वखारिया, शीतल अग्रवाल, रत्नमाला रुईकर, चंदा जैसवाल, अरुंधती शिरसाट, बबीता खंडेलवाल, आशा मोटवानी, कांचन गावंडे, राजेश्री देशमुख, नूपुर समनपुरे, मुक्ता गेही, पशमीना फडणवीस, संगीता भारती, पुष्पा डोडिया, जयश्री, मंजुषा देशमुख, माया तलोकार, काजल राजपाल यांसह अनेक सदस्य उपस्थित होते.





# खरीप पूर्वतयारीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

प्रतिनिधी २५ एप्रिल

◆ निविष्ठांची उपलब्धता ठेवण्याचे निर्देश




**अकोला :** खरीप हंगामात शेतकरी बांधवांना बियाणे, खते, कीटकनाशके यांची कमतरता भासू देऊ नये, तसेच बोगस बियाणे, खते, किटकनाशक यांची विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले.

खरीप पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिका-यांनी गुरुवारी आढावा घेतला. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे, कृषी उपसंचालक हरीश देशमुख, कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव उपस्थित होते. बियाणे विक्रीत कुठेही गैरप्रकार घडता कामा नये. त्यासाठी कृषी भरारी पथके कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले. बियाण्याची गुणवत्ता, बियाणे व इतर निविष्ठा उपलब्धता यादृष्टीने परिपूर्ण नियोजन व्हावे, असेही निर्देश त्यांनी दिले.

अकोला जिल्ह्यात खरीपाचे आगामी हंगामासाठी प्रस्तावित क्षेत्र चार लाख सदतीस हजार १०० हे. आहे. येत्या खरीप हंगामासाठी ६५ हजार १०६ क्विंटल इतकी बियाण्याची संभाव्य मागणी आहे. त्याचप्रमाणे, कापूस पिकाचे संभाव्य क्षेत्रफळ १ लक्ष ४५ हजार हे. असेल. बी.टी. कापूस बियाण्याची संभाव्य मागणी ७ लक्ष २५ हजार पाकिटे आहे. सोयाबीन बियाणे १ लक्ष ७ हजार ४८२ क्विं. असे नियोजन आहे. खतांचा आज रोजीचा शिल्लक साठा ४१ हजार ९०५ मे. टन आहे. आवश्यकतेनुसार निविष्ठा जिल्ह्यात प्राप्त करून घेऊन कुठेही उणीव भासणार नाही याची खबरदारी घेण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी दिले.

# पसार भोंदूबाबाला अमरावतीतून अटक

प्रतिनिधी २५ एप्रिल

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील निंभा गावात अंधश्रद्धेच्या नावाखाली लहान मुलांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या भोंदू बाबाचा अखेर पोलिसांनी पर्दाफाश करीत त्याच्यावर २२ एप्रिल रोजी रात्री गुन्हा दाखल करण्यात आला असता ग्रामीण पोलिस घटनास्थळी सदर भोंदू बाबास अटक करण्याकरीता गेले होते. तो पसार झाला असता ग्रामीण पोलिसांनी कसून तपास करीत भोंदू बाबाला अमरावती येथे आज अटक केली. न्यायालयात हजर केले असता त्यास एक दिवसाची पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

**एक दिवसाची पोलिस कोठडी**

# पिंजर पोलिस स्टेशन अंतर्गत होणारा 'बालविवाह' थांबवण्यात यश

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोला :** पिंजर पोलिस स्टेशन अंतर्गत होणारा बालविवाह थांबवण्यात यश आले. जिल्हा महिला व बालविकास कार्यालय अंतर्गत जिल्हा बाल संरक्षण कक्ष संलग्नीत चाईल्ड लाईन आणि सामाजिक संस्था '?सेस टू जस्टीस' आय. एस. डब्ल्यू. एस अकोलाने धडक कारवाई केली. सेस टू जस्टीस' आय.एस.डब्ल्यू.एस, व चाईल्ड लाईन टीम अकोला ला मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार पिंजर पोलीस स्टेशन अंतर्गत बार्शीटाकळी तालुक्यातील एका गावात १५ वर्षीय बालिकेचा २४ वर्षीय व्यक्तीसोबत बाल विवाह होणार असल्याची माहिती मिळाली.


प्राप्त माहितीनुसार चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये आणि '?सेस टू जस्टीस' आय.एस.डब्ल्यू.एस, अकोला चे जिल्हा समन्वयक शंकर वाघमारे, ग्रामपंचायत अधिकारी संदीप पाळवे, पिंजर पोलीस स्टेशन चे कर्मचारी यांनी घटना स्थळ गाटले. त्यावेळी बालिकेच्या पालकांची भेट घेउन बालिकेच्या पालकांना ग्राम पंचायत कार्यलयात आणून बैठक घेतली. तेव्हा बालिकेच्या आईने माहिती दिली की, मुलीचे वडील दोन वर्षाआधी मरण पावले, तीन मुले, आणि घरची परिस्थिती हलाक्याची या कारणाने बालिकेचा बाल विवाह करत असल्याचे सांगितले. तसेच बालिका व तिचे भावंड यांचे शिक्षण सुद्धा खंडित असल्याचे समजले. तेव्हा सर्वांना बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ बद्दल माहिती देवून मुलीचे वय १८ वर्ष पूर्ण तसेच मुलाचे २१ वर्ष पूर्ण असणे अनिवार्य असल्याचे सांगितले. बाल कल्याण समितीसमोर सुनावणी हे प्रकरण अकोला येथील बाल कल्याण समितीसमोर मांडण्यात आले. बाल कल्याण समितीच्या अध्यक्ष तसेच सदस्य यांनी दोन्ही पक्षांची बैठक घेऊन त्यांना कडक इशारा दिला. १८ वर्षे पूर्ण झाल्याशिवाय मुलीचे व २१ वर्ष पूर्ण मुलाचे लग्न करणे हा फौजदारी गुन्हा असल्याचे स्पष्ट केले. मंडळीचे समुपदेशन करुन बाल विवाहचे दुष्परिणाम समजावून सांगितले. अल्पवयात वयात लग्न लावल्यास मुलीच्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे गंभीर परिणाम पालकांना समजावून सांगितला. तसेच मुलांना शैक्षणिक प्रवाहत आणून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना मिळण्यासाठी मदत करण्यात येईल असे बालिकेच्या आईला सांगण्यात आले. 'मुलीचे वय १८ वर्षे, तसेच मुलाचे २१ वर्ष पूर्ण झाल्याशिवाय लग्न लावणार नाही', अशा आशयाचे कायदेशीर हमीपत्र दोन्ही बाजूंच्या पालकांकडून लिहून घेण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी , व ग्राम बाल संरक्षण समिती यांना साक्षीदार म्हणून घेण्यात आले. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी लक्ष्मण हगवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडुलकर, ग्रामपंचायत अधिकारी संदीप पाळवे, चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये, जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे, पिंजर पोलिस ठाणेदार गंगाधर शेषराव दराडे, महिला पोलीस शिपाई मनीषा संजय कांबळे तसेच सरपंच, अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील यांनी मोलाची भूमिका बजावून या पथकाच्या तत्परतेमुळे बालविवाह थांबविण्यात यश प्राप्त झाले.

# मुख्य बसस्थानका समोर बसचे चाक निखळले

**उखडलेले रस्ते कारणीभूत असल्याचा आरोप**

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोला :** शेगाव आकाराची बस मुख्य बसस्थानकात प्रवेश करीत असतांना ॲक्सल तुटल्याने अचानक बसचे समोरचे चाक निखळले. शुक्रवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास झालेल्या प्रकारामुळे रहदारी खोळंबली तसेच मोठ्या प्रमाणात गर्दी झाली होती. उघडलेल्या रस्त्यामुळे ही घटना घडली. बस वेळीच नियंत्रित झाली नाही तर मोठी दुर्घटना घडली असती असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. हा रस्ता सतत वाहता असतो. बसेस, ऑटोरिक्षा, दुचाकी वाहने ये जा करतात. अशा वेळी बस अचानक बंद पडणे धोकादायक आहे. कारण थोडा जरी अंदाज चुकला तरी मोठी दुर्घटना घडली म्हणून समजा.



मात्र शुक्रवारी रात्री थोडक्यात निभावले. या भागातील उखडलेले रस्ते तातडीने दुरूस्त करावे अशी मागणी आहे. नगरसेवक सागर भारूका यांनी घटनास्थळी पोहचून पाहणी केली. उखडलेला रस्ता अपघाताला कारणीभूत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शहरात ५० सिटी बसेस सुरू करण्याची योजना आहे. परंतु त्यापूर्वी शहरातील रस्ते चांगले करा अशी मागणी त्यांनी महापालिका आयुक्तांकडे केली.

# 'गोदा ते नर्मदा' जलयात्रा, आमदार वसंत खंडेलवाल यांच्या हस्ते निर्गुणा धरणातील कलश जलसंपदा विभागाच्या सुपूर्द

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोला :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीचे औचित्य साधून 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या जलयात्रेसाठी निर्गुणा धरणावर जाऊन तेथे भरलेला जलकलश गुरुवारी आमदार वसंत खंडेलवाल यांच्या हस्ते जलसंपदा खात्याकडे सुपूर्द करण्यात आला. गोदा ते नर्मदा जलयात्रा २०२६ चा शुभारंभ त्र्यंबकेश्वर व चोंडी येथून २५ एप्रिल रोजी होणार आहे. लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्य,



विचार व वारसा जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी २५ ते २९ एप्रिल २०२६ या कालावधीत या जलयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या जलयात्रेदरम्यान मार्गावरील गावांमध्ये व शहरांमध्ये विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, अहिल्यादेवींच्या विचारांचा व्यापक प्रसार घडवून आणण्याचा हा एक प्रेरणादायी उपक्रम ठरणार आहे. या उपक्रमात अकोल्याचाही सहभाग असावा म्हणून येथील निर्गुणा धरणातून जल भरलेला कलश गुरुवारी आमदार वसंत खंडेलवाल यांच्या हस्ते जलसंपदा विभागाकडे सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी जलसंपदा खात्याचे कार्यकारी अभियंता चिन्मय वाकोडे, उपविभागीय अधिकारी आदित्य कासार, शैलेश देशमुख, अरुण खेतान, डॉ.अमोल रावणकर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. चोंढी येथील निर्गुणा धरणावरील जल कलश अर्पणाचा हा कार्यक्रम आटोपल्यानंतर आमदार वसंत खंडेलवाल यांनी मळसूर येथील सोपीनाथ महाराज संस्थानला भेट दिली. त्या ठिकाणी संस्थानच्या वतीने आमदार खंडेलवाल यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांनी व उपस्थित मान्यवरांनी सोपीनाथ महाराजांचे दर्शन घेतले.

# बंदी घातलेले प्लास्टिक विकणाऱ्या व्यावसायिकांना दंड

प्रतिनिधी २५ एप्रिल

**अकोला :** शासनाने बंदी घातलेले प्लास्टीक विक्रेते आणि अस्वच्छता पसरविणा-या व्यावसायिकांवर मनपा स्वच्छता विभागाव्दारे ३६ हजार रूपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली. संबंधितांना इशारा दिला आहे. महापालिका आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये तसेच मनपा उपायुक्त विजय पारतवार यांच्या मार्गदर्शनात २३ एप्रिल रोजी अकोला महानगरपालिका क्षेत्रातील चारही झोन अंतर्गत स्वच्छता विभागाव्दारे विविध भागातील व्यावसायिक प्रतिष्ठांनांची तपासणी केली. तेव्हा काही व्यावसायिकांकडे प्रतिबंधित प्लास्टीकने बनलेल्या वस्तुंचा साठा आढळून आला. तसेच काही व्यावसायिकांव्दारे परिसरात अस्वच्छता पसरवतांना आढळून आल्याने त्यांच्यावर ३६ हजार रूपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. प्रतिबंधित प्लास्टीकचा वापर विक्री टाळा असे आवाहन देखील करण्यात आले

**अस्वच्छता करणारे देखील होणार टार्गेट**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK